
रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १६९
www.ramprahar.com
◆ सोमवार, ५ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

अलिबागमध्ये दरोडा; १५ लाखांचा ऐवज लुटला/२
वर्षभरात जेएनपीएच्या कंटेनर हाताळणीत १२.६४% वाढ/६
कबड्डी शिबिरात महाराष्ट्रातील आठ खेळाडूंची निवड/८

## मावळमध्ये ३२ कोटींचा प्रतिबंधित हुक्का साठा जप्त



**पुणे** : अन्न व औषध प्रशासनाने राज्यात प्रतिबंधित वस्तूंवर कारवाईसाठी कठोर आदेश दिल्यानंतर या उत्पादनांविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. याच कारवाई अंतर्गत पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील टाकवे येथील मे. सोएक्स इंडिया प्रा.लि. या कंपनीवर छापा टाकून तब्बल ३१ कोटी ६७ लाख २१ हजार ९८७ रुपये किमतीचा मुद्देमाल प्रशासनाने जप्त केला आहे. या प्रकरणी कंपनीचे संचालक आणि व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी १ डिसेंबर रोजी या कंपनीच्या उत्पादनांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते. मुंबईतील अन्न विश्लेषकांच्या अहवालानुसार या नमुन्यांमध्ये 'निकोटिन' पॉझिटिव्ह आढळले. हे उत्पादन मानवी आरोग्यास घातक असून महाराष्ट्र सरकारने काढलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणारे असल्याचे स्पष्ट झाले.

# ठाकरे बंधूंची कन्फ्यूजन आणि करप्शनची युती

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा हल्लाबोल

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि.४) मुंबईतील सभेत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरेंवर हल्लाबोल केला. त्यांनी ठाकरे बंधूंचा वचननामा नव्हे; तर 'वाचूननामा' तसेच त्यांची युती ही कन्फ्युजन आणि करप्शनचीची युती असल्याची जळजळीत टीका केली.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंनी सकाळी एक वाचननामा जाहीर केला. हा वचननामा नाही, तर फक्त वाचून दाखवण्याचा नामा आहे. काल आई जिजाऊंची जयंती होती, तेव्हा हा जाहीर करता आला असता, पण आता ज्यांना 'वंदे मातरम'ची ॲलर्जी आहे, त्यांच्यासोबत हे जुने मित्र बसले आहेत. 'वंदे मातरम'ची ॲलर्जी असणाऱ्यांना इतर कशाचीही ॲलर्जी सांगता येत नाही. हा वचननामा फक्त बाळासाहेब ठाकरेंचा होता, आता तो फक्त वाचूननामा दाखवला गेलाय. खोटं बोलायचं असेल, तर आईच्या चरणी हा वचननामा का ठेवायचा? मनाची लाज नसली तरी जनतेची तरी वाटू द्या, असे ते पुढे म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीसांनी उद्धव ठाकरेंच्या २०१७च्या जाहीरनाम्यावर हल्ला चढवला. तेव्हा दिलेल्या पाच वचनांपैकी एकही वचन पूर्ण झाले नाही. २५ वर्ष काम केल्यानंतर पुन्हा त्याच गोष्टी सांगण्याची लाज काही वाटत नाही. दोन युवराज (आदित्य आणि अमित) काहीतरी सादर करत होते, त्यात म्हणाले मुंबईत चांगले शौचालय नाहीत, पण हे बाबा आणि काकांना घरी विचारा, कारण त्यांनीच इतकी वर्षे काम केले, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला.

उद्धव आणि राज यांचे प्रीती संगम नाही, तर भीती संगम आहे. ही कंफ्युजन आणि करप्शनचीची युती आहे. कार्टूनिस्ट आणि कॅमेरामनची युती झाली, असे सांगून फडणवीस म्हणाले की, विरोधकांना मराठी माणूस नको, त्यांना चंगेज मुलतानी हवा. 'मातोश्री'वरून 'शिवतीर्थ'वर गेले, मग 'मातोश्री' जेल म्हणायचे की 'शिवतीर्थ'? त्यांना माहीत आहे की, जे बोलत आहेत ते करण्याची संधी मिळणार नाही.

विरोधक फक्त बोलतात, पण आम्ही काम करतो. आम्ही केवळ इन्फ्रास्टक्चर करणारे नाही, तर लोकांच्या समस्या समजून काम करणारे आहोत. सीओडी म्हणजेच कॉमन ओपन डोर प्रश्न आम्ही सोडवणार आहोत. घरांचा प्रश्नही आम्ही सोडवू. लोकांच्या समस्या आम्ही समजतो आणि सोडवतो, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## मुंबईच्या माजी महापौर शुभा राऊळांचा 'उबाठा'ला जय महाराष्ट्र

### भाजपमध्ये प्रवेश



**मुंबई : प्रतिनिधी**

ऐन निवडणुकीच्या धामधुमीत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. मुंबईच्या माजी महापौर आणि शिव आरोग्य सेनेच्या अध्यक्ष शुभा राऊळ यांनी शिवसेना पक्षाचा राजीनामा दिला. राऊळ यांनी भाजप नेते व मंत्री आशिष शेलार यांची भेट घेतली. त्यानंतर भाजपमध्ये प्रवेश केला.

माजी महापौर शुभा राऊळ यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे राजीनामापत्र दिले. त्यांनी शिव आरोग्य सेनेच्या अध्यक्षपदाचा आणि शिवसेनेच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा सुपूर्द केला. ठाकरेंची साथ सोडल्यानंतर राऊळ यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांनी आमदार प्रवीण दरेकर यांच्या निवासस्थानी मंत्री आशिष शेलार यांची भेट घेतली आणि 'कमळ' हाती घेतले.

दहिसरमधून अनेक टर्म नगरसेविका झालेल्या शुभा राऊळ या ठाकरेंच्या शिवसेनेच्या एक मोठ्या महिला नेत्या मानल्या जातात. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी त्यांच्या युतीचा वचननामा जाहीर केला असताना त्याच दिवशी राऊळ यांनी राजीनामा दिल्याने तो ठाकरेंसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

### मंगेश काळोखे हत्याकांड प्रकरण

## आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांच्या हत्येप्रकरणी अटक १३ आरोपींच्या पोलीस कोठडीत पाच दिवसांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आरोपींचा तुरूंगातील मुक्काम वाढला आहे.



राजकीय वैमनस्यातून शिवसेना शिंदे गटाचे नेते व माजी नगरसेवक मंगेश काळोखे यांची २६ डिसेंबर रोजी रहदारीच्या ठिकाणी अमानूष हत्या झाली होती. पोलीस पथकाने चोवीस तासात हत्येच्या कटातील सूत्रधार आणि सहभागी रवींद्र परशुराम देवकर, उर्मिला रवींद्र देवकर, दर्शन रवींद्र देवकर, धनेश रवींद्र देवकर, सचिन संदीप चव्हाण, महेश शिवाजी धायतडक, सागर राजू मोरे, सचिन दयानंद खराडे, दिलीप हरिभाऊ पवार, ओमकार कृष्णा मगर यांना अटक केली होती, तर एक अल्पवयीन मुलालादेखील ताब्यात घेतले होते. त्या वेळी आरोपींना ४ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी मिळाली होती.

तपासात रवींद्र देवकर यांनी मंगेश काळोखे यांचा खून करण्यासाठी २० लाख रुपयांची सुपारी दिलेल्या ईशा पापा शेख, आदिल मुक्तार शेख आणि खालीद खालील कुरेशी यांना शनिवारी पोलिसांनी पुण्यातून अटक केली. सर्व आरोपींना रविवारी (दि. ४) खालापूर येथील न्यायालयात हजर केले असता ९ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## लोकनेते दि.बा. पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त रक्तदान शिबिर

### रक्तदात्यांचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पनवेल-उरण आगरी समाज मंडळाच्या वतीने रविवारी (दि. ४) भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शिबिरास भेट देत रक्तदात्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव केला.

लोकनेते दि.बा. पाटील २७ गाव संघर्ष समिती आणि रूधीरसेतू सेवा संस्थेच्या सहकार्याने आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात हे शिबिर




झाले. या उपक्रमात मोठ्या संख्येने तरुणांसह नागरिकांनी सहभाग नोंदवला. या वेळी उपस्थितांनी लोकनेते दि.बा. पाटील यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांना आदरांजली वाहिली.

शिबिरास नगरसेविका दर्शना भोईर, पनवेल-उरण आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील, सचिव बी.पी. म्हात्रे, कोषाध्यक्ष विजय गायकर, राजेश गायकर, मनीषा पाटील, प्रा. आकाश पाटील, प्रा. अलोक भानुशाली, सपना पाटील, डॉ. नरेंद्रकुमार दसरे, उन्मेश लोहार, योगेश जोशी, कविता ठाकूर, कविता पाटील, सुवर्णा मार्गे आदी उपस्थित होते.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी पनवेल-मंडळाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## निवडक

### मुंबईत ठाकरे बंधूंचा संयुक्त वचननामा; घोषणांचा पाऊस

**मुंबई** : येथील मुंबई महापालिका निवडणुकीसाठी रविवारी (दि. ४) शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे या दोन्ही बंधूंनी संयुक्त वचननामा प्रकाशित केला. या वेळी दोन्ही नेत्यांनी घोषणांचा पाऊस पाडला. शिवसेना भवन येथे उद्धव व राज ठाकरे यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. यानिमित्ताने तब्बल २० वर्षानंतर राज शिवसेना भवनात आले होते. त्यांनी जुन्या शिवसेना भवनातील आठवणी रोमांचक असल्याचे सांगून नवीन भवनातील बदल कळत, समजत नसल्याचे म्हटले.

### व्हेनेझुएलातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी भारताचा पाठिंबा

**काराकास** : अमेरिकेने व्हेनेझुएला या देशावर हल्ला करून राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना अटक केली आहे. एवढेच नाही तर व्हेनेझुएलामध्ये जोपर्यंत स्थिर सरकार स्थापन होत नाही, तोपर्यंत हा देश अमेरिका चालवणार असल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. यानंतर भारताने व्हेनेझुएलाच्या लोकांच्या कल्याण व सुरक्षिततेसाठी आपला पाठिंबा पुन्हा एकदा जाहीर करत असल्याचे म्हटलेय.

## दिव्यांग क्रांती संघटनेचा भाजप महायुतीच्या उमेदवारांना पाठिंबा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिव्यांगांच्या हक्कासाठी काम करणाऱ्या दिव्यांग क्रांती संघटनेने पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजप महायुतीच्या उमेदवारांना आपला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. या पाठिंब्याचे पत्र संघटनेकडून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

पनवेल महापालिका निवडणुकीकरिता भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय (आठवले गट) महायुतीच्या उमेदवारांना दिव्यांग क्रांती संघटना जाहीर पाठिंबा देत असून संघटनेचे सभासद हितचिंतक व सर्व पदाधिकारी या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी कार्य करतील, असा विश्वास दिव्यांग क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बी.जी.पाटील, महाराष्ट्र सचिव राजाराम गोरे, पनवेल व उरण तालुकाध्यक्ष संदीप काशिद यांनी दिलेल्या पाठिंबापत्रात व्यक्त केला आहे.

## पुण्यात होणार शतक महोत्सवी मराठी साहित्य संमेलन

**सातारा** : शतक महोत्सवी साहित्य संमेलन पुण्यात होणार असल्याची घोषणा रविवारी (दि. ४) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांनी केली. ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप सोहळ्यात जोशी यांनी ही माहिती दिली.

शतक महोत्सवी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने पुढच्या संमेलनात सर्व माजी अध्यक्षांना महादजी शिंदे यांच्या नावे एक लाख रुपयांचा सन्मान निधी देण्यात येत असल्याची घोषणा मंत्री उदय सामंत यांनी केली. याशिवाय संमेलनासाठी ग.दि. माडगुळकर यांच्या नावे निधी जाहीर केला. या वेळी साहित्य परिषदेच्या इमारतीच्या दुरूस्तीसाठी सहा वर्षापूर्वी मागितलेल्या ५० लाखांच्या रकमेत भर टाकून एक कोटी रुपयांचा धनादेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते देण्यात आला.





**पनवेल** : येथील महापालिका प्रभाग क्रमांक १४मध्ये माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि आरपीआय महायुतीचे उमेदवार इक्बाल हुसेन काझी, सारिका अतुल भगत, सतीश दत्तात्रेय पाटील आणि रेणुका मयुरेश नेतकर यांचा प्रचार करण्यात आला. या प्रचार दौऱ्यात भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, गणेश म्हात्रे, मयूर शेळके, जवाद काझी यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रचारादरम्यान मतदारांच्या गाठीभेटी घेण्यावर भर देण्यात आला.

## पनवेल मनपा प्रभाग २मध्ये भाजप महायुतीची रॅली



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक २मध्ये भाजप महायुतीच्या उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करत प्रचाराचा भव्य शुभारंभ केला. भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत ही प्रचार रॅली निघाली.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय (आठवले गट) महायुतीने प्रभाग २मधून काजल पाटील, अरुणा दाभणे, दिनेश खानावकर आणि कृष्णा पाटील या उमेदवारांना निवडणूक रिंगणात उतरवले आहे. प्रचाराच्या पहिल्याच दिवशी उमेदवारांनी प्रभागातील प्रमुख भागांतून रॅली काढली. या माध्यमातून मतदारांशी थेट संवाद साधण्यात आला.

प्रचारादरम्यान भाजप नेते अरुणशेठ भगत यांनी सांगितले की, महापालिकेच्या स्थापनेपासून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विकासाचा ठोस अजेंडा राबविण्यात आला आहे. हाच विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून महायुती मतदारांसमोर जात आहे. आतापर्यंत केलेल्या कामांमुळे जनतेचा महायुतीवर पूर्ण विश्वास असून प्रभाग २मधील मतदार भाजपच्या चारही उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करतील हा विश्वास आहे. या वेळी भाजप महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलीस पंचनाम्यात आता ई-साक्ष ॲपचा वापर

**अलिबाग : प्रकाश सोनवडेकर**

अनेकदा गुन्ह्याच्या खटल्यामध्ये पंच, साक्षीदार फितूर झाल्याने खटल्याच्या निकालावर परिणाम होत असतो. यावर उपाय म्हणून आता ई-साक्ष ॲपचा वापर केला जाणार आहे. यामध्ये घटनास्थळ पंचनाम्यांचे व्हिडीओ आणि ऑडिओ रेकॉर्डिंग केले जाणार असून ते पुरावे म्हणून न्यायालयात सादर करता येणार आहेत. भारतीय न्याय व्यवस्थेचे डिजिटलायझेशन करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल आहे.

केंद्र सरकारच्या माहिती विज्ञान केंद्राने हे ॲप विकसित केले आहे. गुन्हा घडल्यानंतर होणारे वेगवेगळे पंचनामे व्हिडीओ आणि ऑडिओ फॉरमॅटमध्ये रेकॉर्ड करून जसेच्या तसे क्लाउडवर अपलोड केले जाणार आहेत. पुढे हेच रेकॉर्डिंग न्यायालयासमोर पुरावे म्हणून सादर केले जाणार आहेत. यामुळे शिक्षेचा दर सुधारण्यास मदत होणार आहे.

या ॲपमध्ये पोलीस अधिकाऱ्यांना गुन्ह्याच्या घटनास्थळाचे व जप्तीचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यासह सेल्फीसह अपलोड करून पुरावे जतन करता येणार आहेत, ज्यामुळे न्यायालयीन प्रकरणांमध्ये डिजिटल पुराव्यांची स्वीकार्यता वाढते.




### दोषसिद्धीचे प्रमाण वाढणार

रायगड जिल्ह्यात गुन्हे शाबितीचे प्रमाण फार चांगले दिसत नसले तरी सत्र न्यायालयात दोषसिद्धीचे प्रमाण २० टक्के, तर प्रथमवर्ग न्यायालयात हे प्रमाण ६० टक्के इतके आहे. अनेकदा पंच साक्षीदार फितुर होत असल्याने दोषसिद्धीवर त्याचा परिणाम होतो. पंच फितुरीमुळे साधारण २०.८ टक्के गुन्ह्यातील आरोपी निर्दोष सुटतात, पण ई-साक्ष ॲपमुळे दोषसिद्धीचे प्रमाण वाढेल.

### अशी आहे कार्यपद्धती



**डिजिटल पुरावे संकलन** : पोलीस अधिकारी गुन्हेगारी दृश्ये, शोध आणि जप्तीचे ऑडिओ-व्हिज्युअल रेकॉर्डिंग करू शकतात.

**क्लाउड अपलोड** : रेकॉर्डिंग सुरक्षित क्लाउड-आधारित प्लॅटफॉर्मवर अपलोड केले जाते.

**नवीन कायद्यांचे पालन** : हे ॲप भारतीय दंड संहितेसारख्या नवीन गुन्हेगारी कायद्यांच्या तरतुदींचे पालन करते.

**पारदर्शकता आणि जबाबदारी** : ॲप तपास प्रक्रियेत पारदर्शकता वाढवते आणि पुराव्यांची सत्यता सुनिश्चित करण्यास मदत करते.

# महायुतीच्या प्रचारामध्ये हरिनामाचा गजर

## पनवेल प्रभाग ७मध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराने अंतिम टप्प्यात प्रवेश केला असून या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ७ मध्ये भारतीय जनता पक्षाने जोरदार प्रचार करत विकास, संस्कृती व परंपरेचा प्रभावी संदेश दिला आहे. कमळाचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रभागात भाजपच्या प्रचाराला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रभाग क्रमांक ७ मधून भाजपकडून माजी नगरसेवक राजेंद्रकुमार शर्मा, प्रमिला पाटील, अमर पाटील तसेच नव्याने निवडणूक रिंगणात उतरलेल्या मनाली ठाकूर हे चारही उमेदवार प्रचारात पूर्ण ताकदीनिशी सहभागी झाले आहेत. घराघरांत भेटी, मतदारांशी थेट संवाद, प्रचार फेऱ्या, बैठका तसेच सामाजिक व धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून प्रचार सुरू आहे.



प्रचाराचा एक भाग म्हणून शुक्रवारी रात्री कळंबोली सेक्टर १४ येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाला भाजपच्या चारही उमेदवारांनी उपस्थिती लावली. विठ्ठल रुक्मिणी सेवाभावी संस्था व शिवशक्ती मित्र मंडळ, कळंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने २८ डिसेंबर ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक व सांस्कृतिक सप्ताहात राज्यभरातील नामांकित कीर्तनकारांचे कीर्तन, दररोज हरिपाठ, शिवमहापुराण कथा, हरिभजन तसेच विविध भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अनेक वर्षांपासून अखंड सुरू असलेली ही परंपरा समाजात सकारात्मक ऊर्जा, सामाजिक एकोपा व संस्कार रुजवण्याचे कार्य करत आहे. या भक्तिमय वातावरणात भाजपच्या उमेदवारांनी हरीभजनात सहभाग घेत राम कृष्ण हरीच्या गजरात भक्तिरसात तल्लीन होत हिंदू संस्कृती, परंपरा व श्रद्धेचा संदेश दिला.

या वेळी वारकरी संप्रदायाशी संवाद साधत धार्मिक परंपरांप्रती भाजपची बांधिलकी अधोरेखित करण्यात आली. मतदानात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन लोकशाहीचा उत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाला भाजपचे शहर व मंडलस्तरीय पदाधिकारी, बूथ व शक्तिकेंद्र प्रमुख, महिला आघाडी व युवक कार्यकर्ते तसेच परिसरातील भाविक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक वारसा आणि विकासाचा अजेंडा यांची सांगड घालत भाजपने प्रभाग क्रमांक ७ मध्ये प्रचाराला व्यापक आणि प्रभावी स्वरूप दिले आहे.

**प्रभाग क्रमांक सात हा श्रद्धा, संस्कृती आणि विकासाची परंपरा जपणारा प्रभाग आहे. हरिनाम सप्ताहासारखे उपक्रम समाजाला एकत्र आणतात. वारकरी संप्रदायाने दिलेली सेवा, साधेपणा व विचारांची शिकवण आज अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय जनता पक्षाने नेहमीच हिंदू संस्कृती व परंपरेचा सन्मान राखत विकासाची वाटचाल केली आहे. १५ जानेवारी २०२६ रोजी नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदान करून विकास, स्थैर्य आणि संस्कृती जपणाऱ्या भाजपच्या उमेदवारांना आशीर्वाद द्यावा.**

**–राजेंद्रकुमार शर्मा, उमेदवार, प्रभाग क्रमांक ७, पनवेल महानगरपालिका**

# माणकिवली येथे वृद्धाला जमिनीच्या वादातून मारहाण

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यातील माणकिवली गावातील प्रमोद दत्तात्रय दळवी वय ६० यांना चार जणांनी शिवीगाळ व दमदाटी करून मारहाण केल्याची घटना घडली आहे. प्रमोद दळवी यांच्या मालकीची

माणकिवली गावचे हद्दीत जमिन आहे. त्यांच्या शेजारी रमेश काशिनाथ जोशी आणि प्रभाकर काशिनाथ जोशी यांचे राहते घर व राईस मिल आहे. दळवी आणि जोशी यांचेमध्ये जागेच्या हद्दीवरुन वाद चालु असुन जमिनीची भुमि अभिलेख यांचेकडुन मोजणी केलेली असुन जागेची हद्दीवर सिमेंट पोल लावुन हद्द कायम केली आहे. शनिवारी दळवी यांच्या मालकीच्या जागेत दुकानासमोर पशुखादयाचे ट्रक उभा असताना रमेश याने ड्रायव्हर यास येथे गाडी लावायची नाही असे म्हणुन दमदाटी केली.

दळवी याने ही जागा माझी आहे तुझा काय संबंध ट्रक ड्रायव्हर याला शिवीगाळी करायची असे म्हटले असता या गोष्टीचा व मागील जमिनीचा चालु असलेल्या वादाचा राग मनात धरून रमेश, प्रभाकर, निखिल रमेश जोशी व ओमकार रमेश जोशी (रा.डोलवली खालापूर) यांनी दळवी यांना शिवीगाळ, दमदाटी केली. निखिल याने दळवी यांना हाताबुक्क्याने मारहाण करून दुखापत केली.

याबाबत प्रमोद दळवी यांनी खालापूर पोलीस ठाणे येथे चौघां विरोधात तक्रार दिली असून तक्रारी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार रमेश उघडा हे करीत आहेत.

# बिलाचे पैसे देता न आल्याने चक्क मित्राची कार ठेवली गहाण

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर येथील डान्स बारमध्ये मौजमजा केल्यानंतर बिलाचे पैसे देण्यासाठी नसल्याने मित्राची कार गहाण ठेवणाऱ्या विशाल दादासाहेब चव्हाण (वय२८, रा.चोंढी अलिबाग) आणि विलास बालाजीराव भारसावडे उर्फ पाटील (रा. रिस खालापूर) यांच्या विरोधात कार मालकाच्या तक्रारीनंतर खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विशालने त्याचा मित्र अंकित दत्ता साळुंखे (रा.रेवस अलिबाग) याची इनोव्हा कार घेऊन २८ डिसेंबर रोजी खालापूर तालुक्यात लोधिवली येथील विलास याचे समुद्र बार येथे आला होता. बारमध्ये मौजमजा केल्यानंतर बिलाचे पैसे देण्यासाठी नसल्याने विशाल याने अंकितची कार विलास कडे दिली. अंकित याने २ जानेवारीला कार मागितली असता विशाल टाळाटाळ करू लागला. अखेरीस सर्व प्रकार अंकित याला समजल्यावर त्याने विशाल आणि विलास विरुद्ध खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे विशाल आणि विलास विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे हे करीत आहेत.

# चौक येथून अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**खोपोली : प्रतिनिधी**

मोबाईल रिचार्ज करण्यासाठी गेलेली अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार मुलीच्या आईने खालापूर पोलीस ठाण्यात दिली आहे. कुंरुगळा आदिवासीवाडी लोधीवली येथील १७ वर्षे, ०८ वयाची अल्पवयीन मुलगी चौक बाजारपेठेत मोबाईल रिचार्ज करण्याकरीता जाते असे सांगुन ३० डिसेंबरला घरात बाहेर गेली होती.

उशीरापर्यंत मुलगी घरी परत आली नाही म्हणुन तिच्या आईने नातेवाईकांकडे शोध घेतला, परंतु काहीच तपास लागला नाही. अखेरीस मुलीच्या आईने शनिवारी खालापूर पोलीस ठाणे गाठत मुलगी अल्पवयीन आहे हे माहीत असताना देखील तिस कोणीतरी अज्ञात आरोपीत पळवुन नेल्याची तक्रार दिली आहे.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल पवार हे करीत आहेत.

# उपमुख्यमंत्री पवार आज नागोठण्यात

**नागोठणे : बातमीदार**

रोहा तालुक्यातील नागोठणे शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा भव्य पक्ष प्रवेश सोहळा व नागरी सत्कार कार्यक्रम सोमवार ५ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात होणार आहे. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) दक्षिण रायगड जिल्हा नेतृत्व व रायगड जिल्हा परिषद माजी सदस्य किशोर जैन तसेच त्यांचे समर्थक नागोठणे विभाग प्रमुख संजय भोसले, नागोठण्याचे पाहिले लोकनियुक्त सरपंच विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, नागोठण्यातील कणखर महिला नेतृत्व विद्यमान सरपंच सुप्रिया संजय महाडिक यांच्यासह शिवसैनिक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करणार आहेत. कार्यक्रमासाठी नागोठण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते भाईसाहेब टके व त्यांचे सहकारी मेहनत घेत आहेत.

# रसायनीत रिक्षातून मुद्देमाल चोरीला

**खोपोली : प्रतिनिधी**

ठाणे येथून रसायणीत आपटा येथे मेहुणीकडे आलेल्या व्यक्तीच्या रिक्षातून रोख रक्कम व ब्लुटूथ स्पीकर असा एकूण पाच हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार एस.म्हात्रे हे करीत आहेत.

# पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. हे दोन्ही अपघात न्हावाशेवा–पनवेल मार्गावर व टेंभोडे गावाजवळ घडले आहेत. यातील एकाचा मृत्यू दुचाकी रस्ता दुभाजकावर धडकून, तर दुसऱ्याचा मृत्यू डम्परने दिलेल्या धडक दिल्याने झाला आहे.

न्हावाशेवा–पुणे एनएच–४ बी मार्गावरील करंजाडे येथील ब्रिजवर सकाळी ७.४५ च्या सुमारास पहिला अपघात झाला. वसईतील जूचंद्र नायगाव येथे राहणारा गणेश चंद्रकांत खेताल (वय ३१) हा पहाटे वसई येथून मोटारसायकलवरून पुण्याच्या दिशेने जात होता. त्याची दुचाकी न्हावाशेवा–पुणे एनएच–४बी मार्गावरील करंजाडे येथील ब्रिजवर आली असताना, भरधाव दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने त्याची दुचाकी रस्ता दुभाजकावर धडकून हा अपघात झाला.

या अपघातात गणेश गंभीर जखमी होऊन रस्त्यावर पडला. त्यानंतर घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी त्याला रुग्णालयात दाखल केले, मात्र दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. पनवेल शहर पोलिसांनी या अपघाताची नोंद केली आहे. पनवेल तालुक्यातील टेंभोडे गाव येथील एकवीरा ढाब्याजवळ सकाळी ९.४५ च्या सुमारास घडलेल्या दुसऱ्या अपघातात निखिल प्रकाश गोताळे (वय २१) या तरुणाचा मृत्यू झाला. निखिल हा कॉलेजमधून सुटल्यानंतर त्याच्या दुचाकीने पालेखुर्द येथे घरी परतत असताना टेंभोडे गावाजवळ समोरून भरधाव डम्परने दुचाकीला धडक दिली.

या अपघातात निखिल गंभीर जखमी झाल्याने त्याला एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, मात्र त्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. खांदेश्वर पोलिसांनी या अपघाताला जबाबदार असलेला डम्पर चालक गौतम शिंदे याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# भाजपकडून बंडखोर उमेदवारांचे सहा वर्षांसाठी निलंबन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या खारघरमधील अधिकृत उमेदवारांविरोधात उमेदवारी अर्ज दाखल करून पक्षशिस्तीचा भंग केल्याबद्दल निलेश बाविस्कर, गीता चौधरी आणि कोमल शिंदे–दहाडे यांचे पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबन करण्यात आले आहे. संबंधितांनी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढवत बंडखोरी केल्याचे स्पष्ट झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

भारतीय जनता पक्ष ही शिस्तबद्ध संघटना असून पक्षाच्या निर्णयांचे पालन करणे प्रत्येक कार्यकर्त्याला बंधनकारक आहे, मात्र निलेश बाविस्कर, गीता चौधरी आणि कोमल शिंदे–दहाडे यांनी स्वतःच्या स्वार्थापोटी निर्णय घेत भाजपच्या अधिकृत उमेदवारांविरोधात आपले उमेदवारी अर्ज दाखल करत पक्षशिस्तीचा भंग आणि बंडखोरी केली आहे. त्यामुळे बाविस्कर, चौधरी व शिंदे–दहाडे यांना पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे, अशी माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी प्रसारमाध्यमांना दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात एनईपी अभिमुखता व संवेदनशीलता कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात यूजीसी–मालवीया मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र (पूर्वीचे यूजीसी–मानव संसाधन विकास केंद्र), मुंबई विद्यापीठ यांच्या सहकार्याने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० संदर्भात यूजीसी प्रायोजित 'एनईपी ओरिएंटेशन अँड सेन्सिटायझेशन प्रोग्राम'चे आयोजन करण्यात आले आहे.

हा ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम १५ डिसेंबर ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले



होते, महाविद्यालयीन, प्राध्यापक व शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासकांसाठी तो अत्यंत उपयुक्त ठरला. नवीन शैक्षणिक धोरणातील महत्त्वाचे बदल, बहुविषयक शिक्षणपद्धती, क्रेडिट प्रणाली, विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम व उच्च शिक्षणातील सुधारणा याबाबत सखोल मार्गदर्शन या कार्यक्रमात देण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे आयोजन एनईपी व सेमिनार अँड वर्कशॉप कमिटी यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख तसेच सचिव डॉ. एस. टी. गडदे यांचे या उपक्रमाला मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. रीत ठुले, महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे व प्रा. प्रथमेश उदेकर (समन्वयक, वर्कशॉप व सेमिनार कमिटी) यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला. या ओरिएंटेशनसाठी भारतातील वेगवेगळ्या विद्यापीठातील तसेच महाविद्यालयातील १०० पेक्षा अधिक प्राध्यापकांनी नोंदणी केली होती.

या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे शिक्षकांना नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यास मदत झाली, तसेच उच्च शिक्षणाची गुणवत्ता अधिक वृद्धिंगत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. या उपक्रमामुळे शैक्षणिक क्षेत्रात सकारात्मक बदल घडून येऊन शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी नवे दालन खुले होणार असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपक्रमासाठी सहकार्य केले.

# कुकूच–कु कंपनीच्या मालकाच्या घरावर दरोडा

**अलिबाग : प्रतिनिधी**

कुकूच–कु कंपनीचे मालक कुणाल पाथरे यांच्या अलिबाग तालुक्यातील मापगाव येथील घरार दरोडा टाकण्यात आला आहे. दरोड्यात चोरट्यांनी सुमारे १५ लाख रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. यामध्ये एक लाख ५० हजार रुपयांची रोकड तसेच सोन्या–चांदीचे दागिने यांचा समावेश आहे. घरातील कुटुंबीयांचे मोबाईल फोनही चोरट्यांनी चोरून नेले आहेत.

ही घटना मंगळवारी रात्री सुमारे १.३० च्या सुमारास घडल्याचा अंदाज आहे. घरातील सदस्य झोपेत असताना चोरट्यांनी संधी साधत घरात प्रवेश केला. कुटुंबीयांना जाग आल्यावर त्यांना धमकावत चोरट्यांनी कपाटे व ड्रॉवरची झडती घेत मौल्यवान वस्तू चोरून नेल्या.

घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलिस अधीक्षक आँचल दलाल यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि तपासाबाबत मार्गदर्शन केले.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अलिबाग उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे, अलिबाग पोलीस ठाण्याचे निरीक्षक किशोर साळे, मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक सोमनाथ लांडे, सहाय्यक निरीक्षक भारत फार्णे यांच्यासह उपनिरीक्षक संतोष भुंडेरे, दीपक मोरे, सुजीत खोत आदी पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पंचनामा केला आहे.

या प्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस यंत्रणा क्शन मोडवर आली आहे. विशेष पथकाच्या माध्यमातून तपास वेगाने सुरू असून लवकरच या गुन्ह्याचा छडा लागेल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# रायगड पोलिसांची कम्युनिटी पोलिसिंग

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलीस दल नवनवीन आपक्रम राबवित असते. रायगड पोलिसांच्या कम्युनिटी पोलीसींग उप्रकमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. या मोहिमे अंतर्गत बडी कॉप, ज्येष्ठद नागरीक, पोलीस काका, पोलीस दीदी, जागरूक नागरीक असे विविध प्रकारचे उपक्रम राबवण्यात आले.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्या तील शाळा, महाविद्यालयांना भेटी देवून दोन हजार ९०० मुले, मुली व महिला यांच्यात महिला सुरक्षा व सायबर गुन्हेगारीबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नवनवीन उपक्रम राबवण्यात अग्रेसर असलेल्याक रायगड पोलीस दलाने मैदानातदेखील चांगली कागिरी केली आहे.

रायगड पोलीसांनी गुन्हेगारी आणि बेकायदा कारवायांविरूदध नागरीकांना सक्षम करण्यांसाठी रायगड दृष्टीब व्हॉटस ॲप चॅटबॉट हा नवीन डिजीटल उपक्रम सुरू केला आहे. त्या्ला नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभतो आहे. वर्षभरात ४९ तक्रारी नोंद करण्याात आल्यारने प्रभावी कारवाई करणे शक्य झाले आहे.

रायगड जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालये, आश्रमशाळा, शासकीय कार्यालये या ठिकाणी महिला अत्याचार विषयक कायद्याबाबत जनजागृती करण्याहत आली. भरोसा सेल अंतर्गत वर्षभरात प्राप्त झालेल्या तक्रार अर्जामधील ८३ महिलांचे समुपदेशन करून त्यांना मदत करण्यात आली. आपत्कालीन परीस्थितीत मदतीसाठीच्यार डायल ११२ प्रणालीवर वर्षभरात तब्बनल २० हजार ६१७ कॉल्स १ आले आहेत. यामुळे रायगड पोलीसांवरील नागरीकांच्याल विश्वाससाईतेवर शिक्कालमोर्तब झाले आहे.

नागरीकांना आपत्काचलीन परीस्थितीत पोलीसांची मदत तातडीने पोहोचावी यासाठी डायल – ११२ ही प्रणाली कार्यान्वीतत करण्यामत आली आहे. या क्रमांकावर फोन केल्यास जवळच्याय पोलीस ठाण्या्तील यंत्रणा तातडीने घटनास्थ ळी पोहोचून संबंधित व्यपक्तीनला आवश्याक ती मदत पुरवते. रायगड जिल्हाच पोलीस यंत्रणेचा प्रतिसाद वेळ ६ मिनीटे १६ सेकंद इतका आहे. सन २०२५ मध्येल रायगड पोलिसांना असे २० हजार ६१७ कॉल्सआ आले आहेत.

गुन्हायांची उकल करण्यारत दमदार कामगिरी करणारया रायगड पोलीस दलाची मैदानातील कामगिरीदेखील चमकदार ठरली आहे. ५० वी कोकण परीक्षेत्रीय पोलीस क्रीडा स्पचर्धा रत्नाागिरी येथे आयोजीत करण्यारत आल्या होत्या. त्यामध्ये रायगड पोलीस दलाने ३९ सुवर्ण, ४४ रजत आणि ३६ कांस्य पदकांची कमाई करून कोकण परीक्षेत्रात व्दितीय क्रमांक पटकावला. मच्छीरमार बांधव, सागर रक्षक दल व पोलीस यांच्यासमध्येआ समन्वय, सुसंवाद, वाढवण्यालसाठी सप्टेंबर महिन्या्त सागर सुरक्षा चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याललाही चागला प्रतिसाद लाभला.

## दुखवटा

### यमुनाबाई ठाकूर



**पनवेल :** पनवेल तालुक्यातील दिघाटी येथील यमुनाबाई मुकुंद ठाकूर यांचे सोमवार, २९ डिसेंबर २०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. कै. यमुनाबाई ठाकूर यांचा दशक्रिया विधी बुधवारी (दि.७) श्री श्रेत्र नाशिक येथे होणार आहे. तर तेरावा विधी शुक्रवारी (दि. ९) दिघाटी येथे राहत्या घरी होणार आहे. या वेळी कोणत्याही प्रकाराचे दुखवटे स्विकारले जाणार नाही, असे समस्त ठाकूर परिवार (मु. दिघाटी, पो. केळवणे, ता. पनवेल) यांनी कळविले आहे.

### सुभद्रा दिघे



**कर्जत :** कर्जत नगर परिषद क्षेत्रातील मुद्रे (बुद्रुक) गावातील सुभद्रा बबन दिघे यांचे ७१व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या वारकरी संप्रदायाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन कन्या, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# भाजप महायुतीच्या उमेदवारांचा जोरदार प्रचार






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक १५ मध्ये भारतीय जनता पक्ष-महायुतीच्या उमेदवारांनी शनिवारी (दि.३) आपल्या प्रचाराचा नारळ वाढवून जोरदार शुभारंभ केला.

भाजपच्या माध्यमातून गेल्या झालेल्या विकासकामांच्या जोरावर मतदारांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत महायुतीच्या उमेदवारांना मिळत आहे. प्रभाग १५ मधून महायुतीने अनुभवी आणि जनसंपर्क असलेले एकनाथ गायकवाड, सीताताई पाटील, कुसुम पाटील आणि दशरथ म्हात्रे यांना संधी दिली आहे.

प्रचाराचा हा शुभारंभ भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या वेळी बोलताना त्यांनी शहराचा झालेला कायापालट आणि पायाभूत सुविधांमुळे जनता पुन्हा एकदा महायुतीलाच कौल देईल असा विश्वास व्यक्त केला. या वेळी सचिन कवटकर, नितीन विचारे, रोहित कोळी, रामदास पाटील, संदेश भोपी, अक्षय भगत, मनोहर म्हात्रे, संजोत शेळके, अनिकेत गायकवाड, अक्षय वाडकर, सिद्धेश खणावकर, प्रकाश खणावकर, अ‍ॅड.जयंती नाईक, महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप-महायुतीचा प्रचार शिगेला पोहचला आहे. प्रभाग ७ मध्ये महायुतीचे अधिकृत उमेदवार अमर अरुण पाटील, मनाली अमर ठाकूर, प्रमिला रविनाथ पाटील आणि राजेंद्रकुमार दीपचंद शर्मा यांनी रविवारी कळंबोली परिसरात जोरदार शक्तिप्रदर्शन करत प्रचार फेरीत सहभाग घेतला.

या वेळी पदयात्रेच्या माध्यमातून उमेदवारांनी घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधला. विकासकामांची पोचपावती म्हणून मतदारांकडून महायुतीला मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले. या प्रचार दौऱ्यात भाजपचे जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, अमर ठाकूर यांच्यासह भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कळंबोलीतील मुख्य रस्ते आणि सोसायट्यांमध्ये फिरून उमेदवारांनी मतदारांशी संवाद साधून आगामी काळात शहराचा कायापालट करण्याचे आश्वासन दिले. महायुतीच्या या वाढत्या जनसंपर्कामुळे विरोधकांसमोर मोठे आव्हान उभे राहिले असून, मतदारांचा कल पुन्हा एकदा विकासाच्या बाजूने म्हणजेच महायुतीकडे झुकताना दिसत आहे.






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ९ मधील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि आरपीआय महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा रविवारी (दि.४) शुभारंभ वळवली येथून करण्यात आला.

या वेळी महायुतीचे उमेदवार महादेव जोमा मधे, प्रतिभा सुभाष भोईर, दमयंती निलेश भोईर आणि शशिकांत शनिवार शेळके यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेत विजयाचा निर्धार व्यक्त केला. या प्रसंगी नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, सुरेश भोईर, निलेश भोईर, मारुती चिकलेकर, सचिन चौधरी, गोवर्धन पालेकर, सुभाष भोईर, संतोष भोईर, प्रमोद म्हात्रे, राजेश पेटकर, चंद्रकांत पाटील, विश्वास भोईर, दीपक पाटील, के. के. कडू, नामदेव भोईर, जयेश पटेल, तुषार जगदाळे, दर्शन शर्मा, हेमंत ठाकूर, महेंद्र गाडगे, लक्ष्मण गाडगे, कुंदन भोईर, रोहिदास भोईर, अमर पाटील, शंकुनाथ भोईर यांसह नेवाळी, वळवली, कळंबोली व टेंबोड परिसरातील महायुतीचे असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रचाराच्या शुभारंभानंतर उमेदवारांनी प्रभागातील विविध भागात फिरून मतदारांशी संवाद साधला आणि विकासाच्या मुद्द्यावर आपल्याला विजयी करण्याचे आवाहन केले. या मोठ्या जनसमुदायामुळे महायुतीने प्रचारात आपली ताकद दाखवून दिली आहे.








## सी.पी. प्रजापती यांची रायगड जिल्हा प्रमुखपदी नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्य कार्यालय - २सी, बाळासाहेब भवन, नरिमन पॉईंट, शिवसेना न्याय मंदिर भवन, मुंबई-१२ येथे शनिवारी (दि.३) मावळ लोकसभा क्षेत्रातील शिवसेना उत्तर भारतीय संघटनेच्या रायगड जिल्हा प्रमुख (कार्यक्षेत्र - पनवेल, कर्जत, उरण) पदावर चंद्र प्रताप प्रजापती (सी. पी.) यांची नियुक्ती करण्यात आली.

यांच्यासोबत प्रयाग शाह यांची खांदा कॉलनी, नवीन पनवेल पश्चिम; रंजीत श्रीनिवास सिंह यांची करंजाडे, पनवेल; इंद्र बैजनाथ प्रजापती यांची पनवेल; तसेच विकास सत्यनारायण शर्मा यांची नवीन पनवेल पूर्व येथील शहर प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली.

या वेळी शिवसेना राष्ट्रीय प्रवक्ते व उत्तर भारत समन्वयक, उत्तर भारतीय संघटना गुलाबचंद दुबे, शिवसेना महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष जयप्रकाश सिंह (उत्तर भारतीय संघटना), दिनेश सिंह, शिवसेना महाराष्ट्र कोषाध्यक्ष (उत्तर भारतीय संघटना), अनिल शुक्ला, शिवसेना महाराष्ट्र उपाध्यक्ष (उत्तर भारतीय संघटना), शैलेश रायजी, राजेश सिंह, सचिव महाराष्ट्र शिवसेना उत्तर भारतीय संघटना, समाजसेवी एस. एन. शर्मा तसेच इतर मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.



## गहाळ ७५ मोबाईल मूळ मालकांना परत

**पनवेल : वार्ताहर**

खारघर पोलिसांनी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गहाळ झालेल्या तब्बल ७५ मोबाईल फोनचा शोध घेत हे मोबाईल मूळ मालकांना परत करण्याची उत्तम कामगिरी खारघर पोलिसांनी केली. या मोबाईलची एकूण किंमत सुमारे ११ लाख २५ हजार रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या सीईआयआर (सेंट्रल इक्युपमेंट आयडेंटीटी रजिस्टर) पोर्टलच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली. महाराष्ट्रासह इतर राज्यांमधून या मोबाईल फोन शोधून काढत खारघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर पोलिसांनी हे सारे मोबाईल हस्त केले करून ते मूळ मालकांच्या स्वाधीन केले. यापूर्वीही खारघर पोलिसांनी याच तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ७४ गहाळ मोबाईल शोधून नागरिकांना सुपूर्द केले होते.

मोबाईल चोरी व गहाळ होण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर खारघर पोलिसांनी केलेल्या या तंत्रज्ञानाधारित कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. दरम्यान, मोबाईल हरवल्यास नागरिकांनी तत्काळ संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी तसेच सीईआयआर पोर्टलवर आवश्यक माहिती भरावी, असे आवाहन परिमंडळ ३ चे सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम यांनी केले आहे.

यामुळे मोबाईल लवकरात लवकर शोधून काढण्यास मदत होते, असेही त्यांनी या वेळी सांगितले. खारघर पोलिसांच्या या कामगिरीमुळे नूतन वर्षाची सुरुवातच नागरिकांसाठी दिलासादायक ठरल्याचे नागरिक सांगत आहेत.

## काळोखे यांच्या हत्येचा उरणमध्ये शिवसेनेकडून निषेध

**पनवेल : वार्ताहर**

शिवसैनिक मंगेश काळोखे यांच्या हत्येचा उरणमध्ये शिवसेनेने निषेध केला आहे.

शिवसैनिक मंगेश काळोखे यांच्या हत्येचा शिवसेनेच्या कोटनाका राघोबा मंदिर उरण येथे जिल्हाप्रमुख येथे विनोद साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली निषेध करुन उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुलानी यांना निवेदन देण्यात आले. या वेळी महेंद्र पाटील, रमेश म्हात्रे, चंद्रकांत पाटील, मेघाताई दमडे, सुनील भोईर, सुलेमान शेख समद भोंगले, मनोहर ठाकूर, सचिन पाटील, बेबीताई पाटील, योगेश वापर्डेकर, रवींद्र म्हात्रे, दशरथ चव्हाण, नफुज्ञुल फुसाटे, मिरेंद्र शहारे, शाखा प्रमुख संदेश म्हात्रे, शाखा प्रमुख रफिक शेख, शाखा प्रमुख समीर केळकर यांच्यासह शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.

## उरणमध्ये सावित्रीबाई फुले जयंती

**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील महिला विकास कक्षातर्फे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती प्रतिमा पूजन करून साजरी करण्यात आली.

या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.व्ही.गर्जे यांनी सावित्रीबाई फुले यांचे विचार प्रत्यक्षात आचरणात कसे आणावेत याविषयी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर भूगोल विभाग प्रमुख डॉ. आनंद गायकवाड यांनीदेखील सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याचा आढावा घेतला. त्याचबरोबर डॉ. पराग कारूलकर यांनी सावित्रीबाई फुले यांनी विद्यार्थिनींसाठी दिलेल्या संदेश याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.पी आर कारूलकर यांनी केले व आभार डॉ. कांबळे मॅडम यांनी मानले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी त्याचबरोबर विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## पोलीस वर्धापन दिनानिमित्त आरोग्य शिबिर



**पनवेल : वार्ताहर**

पोलीस वर्धापन दिनानिमित्त खांदेश्वर पोलीस ठाण्याच्यावतीने आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.

पोलीस वर्धापन दिनाच्या निमित्ताने नवीन मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची बीपी व शुगर तपासणी करण्यात आली, तसेच आवश्यक प्रोटीन औषधे देण्यात आली डोळ्याची सखोल तपासणी करून आवश्यक आरोग्यविषयी सूचना देण्यात आल्या. कामात आरोग्याचे काळजी घेणे या वेळी सांगण्यात आले.

या उपक्रमाला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे पोलीस अधिकारी व कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

## फुंडे विद्यालयात बालिका दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत विद्यालयाचे प्राचार्य बी. बी.साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १८७वी जयंती साजरी करण्यात आली.

या वेळी विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे उपप्राचार्या एस. डी. थोरात, पर्यवेक्षिका एस. एम. बाबर व उपस्थित होते.

या वेळी विद्यालयातील कांचन घुगे हिच्या समवेत सर्व विद्यार्थ्यांनीनी मी एक स्वतंत्र बालिका आहे, माझे भवितव्य मी घडविणार आहे, या साठी येणाऱ्या अडीअडचनींना धैर्याने तोंड देऊन माझे शिक्षण पूर्ण करण्याची माझी तयारी आहे. ही प्रतिज्ञा घेतली.

बालिका दिन प्रतिज्ञेनंत्तर विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन. पाटील यांनी युग प्रवर्तक नारी सावित्रीबाई फुले यांचे जीवन कार्य विषद केले. विद्या हे धन आहे रे श्रेष्ठ साऱ्या धनाहून, तिचा साठा जया पासी आहे तो खरा धनवान अशा शब्दात शिक्षणाचे महत्व सांगून, स्त्री शिक्षणासाठी अहोरात्र ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांनी जे कार्य केले त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही.

स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या अनाथ मातांच्या कैवारी, निराधार बालकांच्या माता, विधवा विवाहाच्या पुरस्कर्त्या, उत्तम शिक्षिका, मुख्याध्यापिका व स्त्री मुक्ती आंदोलनाच्या प्रणेत्या होत्या. विविध उदाहरणे देत आपले मनोगत व्यक्त केले.



## मतदान जनजागृतीसाठी २५० सायकलस्वारांची भव्य सायकल रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मतदानाविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी पनवेल शहरात रविवारी (दि.४) भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या सायकल रॅलीच्या माध्यमातून सुमारे २५० सायकलस्वारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदानाचे महत्त्व सांगणारा संदेश दिला.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने महापालिकेच्या वतीने निवडणूक अधिकारी मंगेश चितळे यांच्या



मार्गदर्शनाखाली मतदान जनजागृतीसाठी स्वीप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या वेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते व जनसंपर्क अधिकारी नितीन साके उपस्थित होते. या वेळी उपायुक्त डॉ.विधाते यांनी लोकशाहीमधील निवडणुकीचे महत्त्व सांगून, उपस्थित सर्वांना मतदानाची शपथ दिली.

या सायकल रॅलीची सुरूवात वडाळे तलावापासून झाली पुढे खांदा कॉलनी-आदई चौक - न्यू पनवेल पूल-एस.टी. स्थानक-शिवाजी पुतळा-पनवेल महानगरपालिका मुख्यालय व पुन्हा शेवटी वडाळे तलाव अशा मार्गाने ही रॅली झाली. मतदान जनजागृती उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या या सायकल रॅली मध्ये रोड स्पिन वॉरियर्स, आरसीजी न्यू पनवेल, पीसीसी पनवेल, पेडल वॉरियर्स, पनवेल रायडर्स, नॅव्ही, डीसीसी बेलापूर, अनुभव सायकल क्लब, वंडरर्स व निसर्ग मित्र अशा विविध सायकल क्लब्स व सामाजिक संस्थांचा सक्रिय सहभाग नोंदविला. सायकल रॅली यशस्वी पुर्ण केल्याबद्दल सर्व सहभागी सायकलस्वारांना मेडल, प्रमाणपत्र व सायकल क्लबना स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सायकलस्वारांनी नागरिकांशी संवाद साधत मतदानाचे महत्त्व पटवून दिले.

### विविध ठिकाणी पोवाडेही सादर

***लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये मतदारांच्या भूमिकेचे महत्त्व सांगणारा पोवाडा यावेळी आयोजित करण्यात आला. पनवेल महानगरपालिकेकडून पनवेल महानगरपालिका परिसरात विविध ठिकाणी पोवाड्यांचे आयोजन केले आहे. यास सायकल स्वारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.***

## संपादकीय

# भाजप महायुतीचा झंझावात

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा महत्त्वाचा टप्पा येऊन ठेपला आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका होत असून यामध्ये दोन नवनिर्मित महापालिकांचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज दाखल करणे, छाननी, माघार आणि अपक्षांना चिन्हवाटप या सर्व टप्प्यांनंतर आता प्रचार रणधुमाळीला वेग आला आहे. ही निवडणूक केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांची नसून ती राज्याच्या भविष्यातील राजकीय दिशा ठरवणारी मानली जात आहे.

**संपूर्ण प्रक्रियेत सुरुवातीपासूनच भाजप व महायुतीने आघाडी घेतली असल्याचे स्पष्ट दिसत आहे. विशेष म्हणजे मतदान होण्याआधीच महायुतीचे पासष्टहून उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यामध्ये सर्वाधिक ४४ उमेदवार भाजपचे आहेत. लोकशाही प्रक्रियेत बिनविरोध विजय ही बाब सामान्य नाही, परंतु या निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर बिनविरोध निकाल लागणे हे अनेक अर्थांनी महत्त्वाचे आहे. एकीकडे महायुतीची संघटनात्मक ताकद, स्थानिक पातळीवरील कामगिरी आणि कार्यकर्त्यांचे जाळे याचे ते प्रतीक आहे; तर दुसरीकडे विरोधकांची कमकुवत तयारी, अंतर्गत मतभेद आणि नेतृत्वाचा अभावही अधोरेखित होतो. बिनविरोध उमेदवारांची संख्या केवळ आकडा नसून ती जनतेच्या विश्वासाचे प्रतिक आहे. मतदारांमध्ये महायुतीविषयी निर्माण झालेला विश्वास आणि विकासाच्या अजेंड्यावर दिलेला भर यामुळे अनेक ठिकाणी विरोधकांनी थेट माघार घेतल्याचे चित्र आहे. भाजपप्रणित महायुतीने या निवडणुकीत तीन मुद्द्यांवर स्पष्ट वर्चस्व निर्माण केले आहे, ते म्हणजे संघटनात्मक बांधणी, सशक्त नेतृत्व आणि विकासाचा ठोस अजेंडा. महापालिकांमध्ये पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, घनकचरा व्यवस्थापन, स्मार्ट सिटी योजना, घरकुल योजना, आरोग्य सुविधा, वाहतूक व्यवस्थापन यासारख्या मूलभूत प्रश्नांवर महायुतीने गेल्या काळात प्रभावी काम केले आहे. याच कामाचा विश्वास मतदारांमध्ये दिसून येतो. विरोधकांची अवस्था मात्र चिंताजनक आहे. एकत्र येऊन निवडणूक लढवण्याबाबत असलेला गोंधळ, उमेदवार ठरवताना होणारे वाद, स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांमध्ये असलेले मतभेद यामुळे विरोधक प्रचारातच पिछाडीवर पडले आहेत. काही ठिकाणी तर विरोधकांकडे सक्षम उमेदवारच नसल्यामुळे बिनविरोध विजयाची परिस्थिती निर्माण झाली. ही बाब त्यांच्या संघटनात्मक कमकुवततेचे द्योतक आहे. महापालिका निवडणूक ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेची लढत नसते; ती जनमताचा कौल असते. त्यामुळेच या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. नगर परिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये महायुतीने जे प्रचंड यश मिळवले, त्याच प्रवाहाचा विस्तार आता महापालिकांमध्ये होत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. हा कल आगामी राज्य व राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. शहरी मतदार आज अधिक जागरूक आहे. तो केवळ घोषणांवर नाही, तर प्रत्यक्ष कामगिरीवर मतदान करतो. वाहतूक, पाणी, प्रदूषण, कचरा व्यवस्थापन, आरोग्य सुविधा, डिजिटल सेवा यासारख्या प्रश्नांवर काम करणाऱ्या पक्षालाच तो संधी देतो. महायुतीने या सर्व आघाड्यांवर सातत्यपूर्ण काम केल्यामुळेच शहरी भागात तिचे वर्चस्व वाढले आहे. संपूर्ण परिस्थितीचा विचार करता हे स्पष्ट होते की महायुती संघटनात्मकदृष्ट्या मजबूत आहे. विकासाच्या मुद्द्यावर तिची विश्वासार्हता टिकून आहे, तर विरोधक गोंधळलेल्या अवस्थेत आहेत. मतदारांचा कौल काम करणाऱ्यांच्या बाजूने झुकत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका निवडणुकीतही महायुतीच बाजी मारेल, अशी शक्यता दिसत आहे.**

# मराठी साहित्यिक श्रीपाद नारायण पेंडसे



श्रेष्ठ मराठी कादंबरीकार आणि साहित्यिक अशी श्रीपाद नारायण पेंडसे यांची ओळख. त्यांचा जन्म ५ जानेवारी १९१३ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मुर्डी या गावचा. इयत्ता तिसरीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण कोकणात, दापोली येथे, नंतर बीएस्सीपर्यंतचे मुंबईत झाले. काही काळ (१९३३–४२) ते शिक्षक होते.

पुढे मुंबईच्या बेस्ट या परिवहनसंस्थेत ते नोकरी करू लागले आणि उप–जनसंपर्क अधिकारी पदावरून १९६८मध्ये निवृत्त झाले. खडकावरील हिरवळ (१९४१) हे पेंडसे यांचे पहिले पुस्तक. त्यात त्यांनी लिहिलेली शब्दचित्रे संग्रहित केलेली आहेत. अशा शब्दचित्रात्मक लेखनाकडून नंतर ते कादंबरीकडे वळले. एल्गार (१९४९) या त्यांच्या पहिल्याच कादंबरीला जाणत्या रसिकांचा आणि समीक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर हद्दपार (१९५०) गारंबीचा बापू (१९५२), हत्या (१९५४), यशोदा (१९५७), कलंदर (१९५९), रथचक्र (१९६२), लव्हाळी (१९६६) आणि ऑक्टोपस (१९७२) अशा नऊ कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. एल्गारपासून कलंदरपर्यंतच्या सहा कादंबऱ्यांत साखरपेंडी, दापोली, मुर्डी, गारंबी, हर्णै, दुर्गेश्वर इ. गावांच्या–यांपैकी गारंबी हे प्रत्यक्षातील आसूदवरून सुचलेले आणि साखरपेंडी, दुर्गेश्वर अनुक्रमे आंजर्ले आणि मुरुड या गावांवरून सुचलेली ठिकाणे आहेत.

परिसरातील कोकणचा निसर्गसमृद्ध प्रदेश त्यांनी प्रभावीपणे चित्रित केल्यामुळे प्रादेशिक कादंबरीकार म्हणून त्यांची प्रतिमा प्रस्थापित झाली. कादंबरीद्वारा अभिव्यक्त होणाऱ्या जीवनानुभूतीची एक अपरिहार्य गरज म्हणूनच त्या परिसराचे चित्रण त्यांच्या कादंबरीत आले त्यामुळे व्यक्ती व तिच्या भोवतालचा प्रदेश यांच्यातील अपरिहार्य नात्याची जाणीव त्यातून व्यक्त झाली. घटना–प्रसंग, निवेदन, संवाद, भाषाशैली यांसारख्या कादंबरीच्या घटकांची वेगवेगळी जाणीव ठेवून कांदबरीत केल्या जाणाऱ्या कृत्रिम सजावटीचे तंत्र पेंडसे यांनी स्वीकारले नाही. त्यांच्या प्रत्येक कादंबरीतील जीवनानुभव सहज–स्वाभाविकपणे रूपास येत गेला त्यामुळे कादंबरीच्या रूपाची एक वेगळी, अधिक परिपक्व जाणीव जोपासणारे कादंबरीकार म्हणूनही ते ख्याती पावले.

रथचक्र, लव्हाळी आणि ऑक्टोपस ह्या तीन कादंबऱ्या, पेंडशांच्या कादंबरीने घेतलेल्या वेगळ्या वळणाच्या द्योतक आहेत. साधू बनून परागंदा झालेल्या नवऱ्याचा संसार सांभाळणाऱ्या एका सामान्य स्त्रीचे भावजीवन आणि तिचा जीवनसंघर्ष रथचक्रात प्रत्ययकारीपणे साकारलेला आहे. या कादंबरीला साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले (१९६४). लव्हाळी ही कादंबरी एका सामान्य कारकुनाच्या रोजनिशीच्या स्वरूपात अवतरलेली आहे. जागतिक महायुद्धासारखी महान घटना घडत असताना त्याच्या जीवनात कोणत्या घडामोडी होत होत्या व त्या महान घटनेने त्याच्या जीवनाला कितपत स्पर्श केला याचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. ऑक्टोपस या कादंबरीत, संवाद व पत्रे यांच्या सहाय्याने पूर्ण आशय पेलण्याचा प्रयोग त्यांनी करून पहिला आहे. फडके–खांडेकर युगानंतरची नवी मराठी कादंबरी प्रामुख्याने पेंडसे यांच्या कादंबऱ्यांतून प्रकटली.

रंजनात्मकतेच्या पलीकडे जाऊन, स्वतः ला तीव्रतेने जाणवलेली अनुभवसृष्टी त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून प्रामाणिकपणे उभी केल्यामुळे हरिभाऊंच्या परंपरेशी पेंडसे यांच्या कादंबरीलेखनाचा सांधा सहजपणे जुळला. आपल्या अनुभवांचे रंगरूपही त्यांनी बारकाईने न्याहाळून आणि समजावून घेतले होते. विशिष्ट प्रदेशात आणि वातावरणात माणसांची मने आणि जीवने कसकसे रंग धारण करतात या संबंधीच्या शोधातून आणि आकलनातून जन्माला आल्यामुळे पेंडशांच्या कादंबरीला मोठे बळ लाभलेले आहे. तथापि, कल्पनारम्यता आणि स्वप्नरंजन यांचा मोह त्यांनाही पूर्णतः टाळता आलेला नाही, अशी टीकाही त्यांच्या कादंबऱ्यांवर झालेली आहे. पेंडशांनी नाट्यलेखनही केलेले आहे.

राजे मास्तर (१९६४), यशोदा (१९६५), गारंबीचा बापू (१९६५), असं झालं आणि उजाडलं (१९६९) ही त्यांची नाटके त्यांच्या अनुक्रमे हद्दपार, यशोदा, गारंबीचा बापू आणि लव्हाळी या कादंबऱ्यांची नाट्यरूपे असून महापूर (१९६१), संमूसांच्या चाळीत (१९६७), चक्रव्यूह (१९७०) अशी काही स्वतंत्र नाटकेही त्यांनी लिहिली आहेत. जुम्मन (१९६६) हा त्यांचा कथासंग्रह.

श्री. ना. पेंडसे : लेखक आणि माणूस हे त्यांचे आत्मचरित्र १९७४ मध्ये प्रसिद्ध झाले. आपल्या जीवननिष्ठांचा आणि जीवनातील घटनांचा अन्वयार्थ लावण्याची डोळस चिंतनशीलता या आत्मचरित्रात आढळून येते. लेखक म्हणून अनेक सन्मान पेंडसे यांना लाभलेले आहेत. हद्दपार, हत्या, कलंदर या कादंबऱ्यांना व संमूसांच्या चाळीत आणि चक्रव्यूह या नाटकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळालेले आहेत. अन्य भाषांतून पेंडसे ह्यांचे साहित्य अनुवादित झालेले आहे. गारंबीचा बापू गुजराती, हिंदी व इंग्रजी या भाषांतून हद्दपार गुजराती व इंग्रजीमधून रथचक्र गुजराती व हिंदी मधून आणि हत्या व कलंदर गुजरातीतून प्रसिद्ध झालेल्या आहेत.

रॉकफेलर फाउंडेशनच्या लेखकांकरिता असलेल्या 'प्रवास शिष्यवृत्ती'–करिता फाउंडेशनने १९५५मध्ये त्यांची निवड केली होती. ही शिष्यवृत्ती मिळविणारे पेंडसे हे मराठीतील (आणि भारतातीलही) पहिले साहित्यिक. एकूण १५ महिन्यांच्या या शिष्यवृत्तीच्या काळात इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड, पश्चिम, जर्मनी, अमेरिका, जपान, फिलिपीन्स, श्रीलंका आदी देशांत ते गेले आणि अनेक परदेशी साहित्यिकांशी त्यांनी विचारविनिमय केला.

**–लता मोहरीर (मराठी विश्वकोष)**

# लेखक आणि भाषातज्ज्ञ कृष्णाजी कुलकर्णी



कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, (५ जानेवारी १८९२–१२ जून १९६४). मराठी भाषाशास्त्रज्ञ व ग्रंथकार. जन्म सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथे. इस्लामपूर, नाशिक, कोल्हापूर, पुणे, मुंबई इ. ठिकाणी एमए, बीटीपर्यंतचे शिक्षण. प्रारंभी काही काळ शिक्षक. पुढे अहमदाबाद व मुंबई येथे अनुक्रमे संस्कृतचे व मराठीचे प्राध्यापक होते.


मुंबई येथील एका महाविद्यालयाचे ते काही काळ प्राचार्यही होते. 'मराठी संशोधन मंडळा'चे ते संचालक होते (१९४८–५०) तसेच महाराष्ट्र शासनाच्या भाषा सल्लागार मंडळाचे अध्यक्ष आणि शुद्धलेखन समितीचे ते कार्यवाह होते.

भाषाशास्त्राची सामान्य तत्त्वे व मराठीची भाषिक परंपरा आटोपशीरपणे मांडणारा मराठी भाषा : उद्गम व विकास (१९३३) आणि मराठी शब्दांची तौलनिक निरुक्ती देणारा मराठी व्युत्पत्तिकोश (१९४६) हे त्यांचे प्रमुख ग्रंथ. याशिवाय भाषाशास्त्र व मराठी भाषा (१९२५), शब्द : उद्गम आणि विकास (१९५३) आणि त्यांच्या निधनोत्तर डॉ. ग. मो. पाटील यांनी संपादिलेले मराठी व्याकरणाचे व्याकरण (१९६९) ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. राजवाडे मराठी धातुकोश (१९३७) या ग्रंथाचे संपादन करून त्यास त्यांनी विवेचक प्रस्तावना लिहिली. तसेच पाठचिकित्साशास्त्रास अनुसरून मुकुंदराजाच्या विवेकसिंधूचे संपादन केले (१९५७).

पेशवे दप्तराचे ४५ खंड (१९३०–३४), ऐतिहासिक पत्रव्यवहार (१९५७) आणि महाराष्ट्रगाथा (१९६०) या ग्रंथांचे ते सहसंपादक होते. संस्कृत ड्रामा अँड ड्रॅमॅटिस्ट्स (१९२६) हे त्यांचे इंग्रजी पुस्तक. जी.एफ. म्यूरच्या द बर्थ अँड ग्रोथ ऑफ रिलिजन या ग्रंथाचे भाषांतर त्यांनी धर्म : उद्गम आणि विकास (१९३७) या नावाने केले. कृष्णाकांठची माती (१९६१) हे त्यांचे आत्मचरित्र.

१९५२ साली अमळनेर येथे भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान त्यांस लाभला होता. मुंबई येथे ते निवर्तले.

**–स.गं. मालशे**
(मराठी विश्वकोष)



## बदलते तंत्रज्ञान

# घरबसल्या मतदार ओळखपत्र आधारशी असे लिंक करा

भारतीय निवडणूक आयोगाने आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या तारखा नुकत्याच जाहीर केल्या आहेत.



महापालिका निवडणुकीचे मतदान १५ जानेवारी रोजी होणार असून मतमोजणी ही १६ जानेवारी रोजी पार पडेल. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाकडून मतदारांना त्यांचे मतदार ओळखपत्र म्हणजेच वोटर आयडी हे त्यांच्या आधार कार्डशी लिंक करण्याचे आवाहन केले जात आहे.

मतदाराने त्याचे आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्र लिंक केल्यास खोट्या किंवा बनावटी मतांची शक्यता कमी करण्यास मदत होते तसेच मतदान प्रक्रिया सुरळीत होण्यास मदत होते. हे करण्यासाठी कुठेही जाण्याची आवश्यकता पडत नाही. अगदी तुम्ही घरबसल्या तुमचे वोटर आयडी आणि आधार कार्डशी लिंक करू शकता. आज आपण याची प्रक्रिया समजून घेणार आहोत.

मतदार ओळखपत्र–आधार कार्ड लिंक करण्याची प्रक्रिया

सर्वप्रथम https://voters.eci.gov.in/ या अधिकृत वेबसाइटवर जा.

तुम्ही याआधी या पोर्टलवर नोंदणी केली नसल्यास, तुमचे एक नवीन अकाउंट तयार करा. मात्र, तुमचे अकाउंट अस्तित्वात असल्यास, क्रेडेन्शियल्स वापरून लॉग इन करा.

मुख्य पानावर खाली स्क्रोल करा आणि Letter of Information of -adhaar number for the purpose of electoral roll authentication (Form ६B) या पर्यायावर क्लिक करा. यानंतर तुम्हाला तुमचा EPIC क्रमांक (मतदार आयडी क्रमांक) आणि आधार क्रमांक यांसारखे तपशील भरण्यास विचारले जाईल. माहिती भरल्यानंतर आधार कार्डशी लिंक असलेल्या मोबाइल क्रमांकावर एक OTP (वन–टाइम पासवर्ड) पाठवला जाईल. ओळख पटवून देण्यासाठी या पोर्टलवर हा OTP भरा. दिलेल्या ओटीपीची पडताळणी पूर्ण झाल्यावर तुमचे आधार कार्ड तुमच्या मतदार आयडीशी लिंक करण्याची विनंती सबमिट करा. विनंती सबमिट केल्यानंतर एक कन्फर्मेशन मेसेज येईल, ज्यामध्ये विनंती यशस्वीरित्या सबमिट केली गेली आहे असे सांगितले जाईल. त्यानंतर निवडणूक आयोग तुम्ही दिलेल्या सर्व तपशीलांची पडताळणी करेल. सर्व माहिती योग्य व खरी असल्याची ओळख पूर्ण झाल्यानंतर आधार कार्ड मतदार ओळखपत्राशी लिंक केले जाईल.

# अभिनेत्री आणि गायिका फय्याज



मराठी नाट्य–अभिनेत्री आणि गायिका फैयाज यांचा जन्म ५ जानेवारी १९४८चा. त्यांचे मूळ नाव फैयाज इमाम शेख. त्यांचा जन्म सोलापूर येथे झाला. सोलापुरात असताना त्या कलापथकात केवळ नृत्य सादर करीत असत. त्यानंतर त्या हौशी रंगभूमीवर आल्या. मुंबईत आल्यावर त्यांनी 'कट्यार काळजात घुसली' या नाटकात झरीनाची भूमिका केली आणि त्यांना अमाप प्रसिद्धी मिळाली.

इ.स. १९६६पासून त्या मराठी नाटकांत कामे करीत आहेत. सोलापूरमध्ये आपल्या नाट्य कारकिर्दीला सुरुवात करणाऱ्या फैयाज यांनी 'गीत गायिले आसवांनी' या नाट्यसंपदेचे भावंडं असलेल्या विजयश्री प्रॉडक्शनच्या नाटकाद्वारे मुंबईच्या नाट्यसृष्टीत पदार्पण केले.

फैयाज यांनी गद्य नाटके, संगीत नाटके, पार्श्वगायन, काव्यवाचन, संगीत शिक्षण, हिंदी–मराठी चित्रपट, मराठी मालिका, हिंदी मालिका अशा विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविला आहे. गेली अनेक वर्षे अविरतपणे मराठी रंगभूमीची त्या मनोभावे सेवा करीत आहेत. मराठी रंगभूमीवर प्रदीर्घ कारकीर्द करणाऱ्या नाट्यकलावंतांला मिळणारे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

फैयाज यांनी निरनिराळ्या पिढीतल्या आणि वेगवेगळ्या स्कूल्सच्या लेखक–दिग्दर्शकांकडे वैविध्यपूर्ण भूमिका साकारल्या.


## निमित्त

संगीत नाटके, सामाजिक, पौराणिक, ऐतिहासिक, विनोदी अशा सर्वच प्रकारच्या नाटकांतून त्यांनी काम केल्याने त्यांच्यावर एकच एक असा कोणताच शिक्का बसला नाही. गाण्यातही त्यांनी गजल, ठुमरी, लावणी, नाट्यसंगीत असा चौफेर प्रवास केला. गायिका बेगम अख्तर यांच्या गंडाबंद शागीर्द बनण्याची संधी त्यांना चालून आली होती. परंतु त्यावेळी त्यांची नाट्य–कारकीर्द ऐन बहरात असल्याने ती सोडून लखनौला बेगम अख्तरांकडे गाणे शिकायला जाणे त्यांना शक्य झाले नाही, मात्र जेव्हा जेव्हा बेगम अख्तर मुंबईत येत तेव्हा तेव्हा त्या फैय्याज यांना गाणे शिकवित.

'अश्रूंची झाली फुले', 'कट्यार काळजात घुसली', 'वीज म्हणाली धरतीला', 'मत्स्यगंधा', 'होनाजी बाळा', 'तुझे आहे तुजपाशी', 'वेड्याचं घर उन्हात', 'वेगळं व्हायचंय मला', 'गुंतता हृदय हे', 'पेइंग गेस्ट' ते अलीकडच्या 'मित्र'पर्यंतच्या नाटकांत फैय्याज यांच्या भूमिका आहेत. 'कट्यार' मधील झरीना तसेच 'वीज म्हणाली धरतीला'तील जुलेखा या भूमिकांवर तर त्यांनी आपली अमीट नाममुद्रा उमटवली होती. 'गुंतता हृदय हे'मध्ये कल्याणी साकारणाऱ्या फैय्याज यांनी 'महानंदा' चित्रपटात मानूची भूमिका तितक्याच ताकदीने जिवंत केली होती. यातून त्यांच्या अभिनयाची रेंज कळून येते. त्यांना डबिंग मास्टरही म्हणले जाई. 'जाणता राजा'मध्ये त्यांनी गाणे व निवेदन केले आहे.

दादा कोंडके यांच्या 'विच्छा'मध्ये साडेसातशे प्रयोगांत त्यांनी गाणी गायिली. सी. रामचंद्र, वसंत देसाई, जयदेव, मदनमोहन, एस.डी. व आर.डी. बर्मन यांसारख्या संगीतकारांकडेही त्या गाणी गायल्या. पंडित सी.आर. व्यास यांच्याकडे गाणे शिकलेल्या फैय्याजना पं. जितेंद्र अभिषेकी, वसंतराव देशपांडे यांच्याबरोबर केलेल्या नाटकांमुळे त्यांच्याकडूनही भरपूर शिकायला मिळाले. पुलंबरोबरही त्यांनी 'वटवट'मध्ये काम केले होते. या सगळ्या वाटचालीत त्यांना अनेक मानसन्मानही मिळाले. (साभार : विकिपीडिया)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# ऐन चाळिशीत कॅन्सर होण्याची पाच प्रमुख कारणे

सध्याच्या धावपळीच्या आणि बिझी लाईफस्टाईलमध्ये अनेक आजार लहान वयातच डोके वर काढतात आणि त्यात कॅन्सरसारखा गंभीर आजारही आता केवळ वृद्धांपुरता मर्यादित राहिलेला नाही. विशेषतः वयाच्या चाळिशीत कॅन्सर होण्याचे प्रमाण वाढताना दिसत आहे, ही बाब चिंतेची आहे.



तासन्तास एकाच जागी बसून काम करणे, जंक फूड आणि फास्ट फूड जास्त प्रमाणात खाणे, आहारात साखरेचे वाढलेले प्रमाण आणि अपुरी झोप यामुळे शरीराची नैसर्गिक कार्यक्षमता कमी होते. गरजेपेक्षा जास्त अँटीबायोटिक्स घेतल्यामुळे पोटातील चांगल्या बॅक्टेरियांचे नुकसान होते. यामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमी होते आणि पर्यायाने कॅन्सरचा धोका वाढतो.

हवेतील PM२.५सारखे सूक्ष्म आणि अतिशय धोकादायक प्रदूषक कण श्वासावाटे थेट फुफ्फुसांत शिरतात. हे कण शरीरात सूज निर्माण करतात, ज्यामुळे रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होते. हे विषारी कण शरीरातील पेशींच्या DNAला हानी पोहचवतात. जेव्हा DNAमध्ये बिघाड होतो, तेव्हा पेशींची वाढ अनियंत्रित होते आणि त्यातून कॅन्सरची गाठ तयार होऊ शकते. वाहनांचा धूर, खराब हवा आणि घरांमध्ये खेळत्या हवेचा अभाव यामुळे कॅन्सरचा धोका वाढत आहे.

काही लोकांमध्ये कॅन्सरचा धोका हा BRCA जीन म्यूटेशन किंवा कुटुंबातील कॅन्सरच्या इतिहासामुळे असतो, मात्र अशा प्रकरणांची संख्या तुलनेने खूप कमी आहे. थोडक्यात सांगायचे तर, चुकीची लाईफस्टाईल कॅन्सरच्या प्रक्रियेला वेग देते.

बहुतांश तरुणांना असे वाटते की, कॅन्सर हा केवळ वृद्धांना होणारा आजार आहे. आपल्याला इतक्या लवकर असा आजार होऊच शकत नाही, या मानसिकतेमुळे ते शरीरातील बदलांकडे दुर्लक्ष करतात. शरीरात होणाऱ्या छोट्या गाठी, अपचन, सततचा थकवा किंवा वजनातील घट यांसारख्या सुरुवातीच्या लक्षणांना तरुण पिढी कॉमन समस्या समजून घरगुती उपाय किंवा पेनकिलर्स घेऊन टाळतात. याच चुकीच्या विचारसरणीमुळे जेव्हा तरुण रुग्ण डॉक्टरांकडे पोहचतात, तेव्हा अनेकदा कॅन्सर तिसऱ्या किंवा चौथ्या टप्प्यात पोहोचलेला असतो. वेळेवर निदान न होणे हेच मृत्यूदराचे मुख्य कारण ठरत आहे.

डॉक्टरांच्या मते, कॅन्सरची सुरुवातीची लक्षणे ओळखून वेळीच तपासणी करणे आवश्यक आहे. शरीराच्या कोणत्याही भागात सतत वेदना होत असतील आणि औषधांनीही आराम मिळत नसेल, तर ते चिंतेचे कारण असू शकते.

# तीर्थक्षेत्र पालीमध्ये भाविकांसह पर्यटकांना गुगल मॅपचा चकवा

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीत बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी तसेच पुढे तळ कोकणात जाण्यासाठी पर्यटक व भाविकांची रेलचेल सुरू असते. नववर्षात हजारोंच्या संख्येने भाविक व पर्यटक आणि त्यांची वाहने पाली शहरातून ये–जा करत आहेत. मात्र अनेकजण गुगल मॅप लावून आत येण्याचा व जाण्याचा रस्ता शोधत आहेत, मात्र येथील नो इन्ट्रीच्या रस्त्याची गुगल मॅपला नोंदच नसल्याने अनेक वाहने नो इन्ट्रीमध्ये प्रवेश करतात आणि त्यामुळे वाहतुकीला अडथळा होऊन वाहतूक कोंडी होते.

पाली शहरातून पुढे विळे निजामपूर मार्गे माणगाव, महाड, श्रीवर्धन तसेच तळ कोकणात व पुण्याकडे जाण्यासाठी मार्ग आहे. तर तिकडून येणारी वाहने पाली खोपोली राज्य महामार्गारून पुणे मुंबईकडे जातात. या सर्व वाहनांना पालीतील अंतर्गत रस्त्यावरूनच जावे लागते. पालीत प्रवेश करण्यासाठी स्टेट बँक येथून व पाली बाहेर पडण्यासाठी महाकाली मंदिराजवळून विक्रमस्टॅन्ड मार्गे असे दोन मार्ग निर्धारित केले आहेत. या ठिकाणी प्रवेश बंद व बाहेर पडण्याची आणि जाण्याचे मोठे फलक देखील लावण्यात आले आहेत, पण गुगलवर प्रवेश बंद असल्याची नोंद मात्र करण्यात आलेली नाही.

अनेकजण मार्ग शोधण्यासाठी अॅडव्हान्स तंत्रज्ञानाचा म्हणजेच गुगल मॅपचा वापर करत आहेत. अशावेळी गुगल मॅपवर रस्ता बंद दिसत नसल्याने ही वाहने प्रवेश बंद असलेल्या मार्गावरून जातात. परिणामी मोठी वाहतुक कोंडी होत आहे.



### इतर वाहनांचीही रेलचेल

***मुंबई–गोवा महामार्गाची दुरवस्था झाली आहे, तेथे वारंवार वाहतूक कोंडी होते. त्यामुळे मुंबई वरून कोकणाकडे जाणारे प्रवासी पालीतून विळे मार्गे माणगाव वरून किंवा वाकणवरूण पुढे जातात, तर कोकणाकडून येणारी वाहने माणगाव वरून विळे मार्गे पालीतून खोपोलीमार्गे पुणे–मुंबईकडे जातात. परिणामी पालीत वाहनांची रेलचेल वाढून वाहतूक कोंडी अधिकारी जटील होते.***

**“ प्रवेश बंद असलेल्या रस्त्याची नोंद गुगल मॅप वर करावी यासाठी संबधीत विभागासोबत पत्रव्यवहार केला आहे. यासंदर्भात पाठपुरावा देखील करत आहोत. लवकरच त्यांच्यासोबत बैठक बोलावली आहे. रस्त्याच्या सुरुवातीलाच नो एंट्रीचे मोठे फलक लावण्यात आले आहेत. वाहन चालकांनी देखील वाहतुकीचे नियम पाळावे व नो एन्ट्रीचे फलक पाहूनच मार्गक्रमण करावे.**

**–सुलतान बेनसेकर,** उपनगराध्यक्ष, नगरपंचायत, पाली

**येथील रस्ते अरुंद आहेत. शिवाय नो एंन्ट्रीमधुन जाणारी वाहने तापदायक ठरतात. यामुळे वाहने अडकून पडून वाहतूक कोंडी जटिल होते. लवकर या नो एंट्री मार्गाची गुगल मॅपवर नोंद करावी जेणेकरून वाहने प्रवेश बंद असलेल्या रस्त्यावर प्रवेशच करणार नाहीत.**

**–अमित निंबाळकर,** माजी ग्रामपंचायत सदस्य, पाली

## ‘आशा फाउंडेशनची शिष्यवृत्ती मुलींच्या शैक्षणिक प्रगतीस चालना देणारी’

**तळा : प्रतिनिधी**

मुलींना आशा फाउंडेशनची मिळणारी शिष्यवृत्ती शैक्षणिक प्रगतीस चालना देणार, असे उद्गार गो.म.वेदक विद्यामंदिर तळाच्या सभागृहात आशा फाउंडेशनच्या माध्यमातून शिष्यवृत्ती वाटप कार्यक्रमावेळी आदिती तटकरे यांनी काढले.



या वेळी उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, तहसिलदार स्वाती पाटील, गटविकास अधिकारी महादेव शिंदे, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, संस्थेचे पदाधिकारी मंगेश देशमुख, पुरषोत्तम मुळे, आशा फाउंडेशनचे अध्यक्ष दत्तात्रय जगताप, सचिव अमोल भोसले मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, अधिकारी, पदाधिकारी, पालक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

आशा फाउंडेशनच्या माध्यमातून लेक सावित्रीची या उपक्रमानुसार वसा ’सावित्री’चा आदर्श समाज घडवण्याचा अंतर्गत रायगड व सातारा या दोन जिल्ह्यात सुरू केला असून ५ वी ते १० तील विद्यार्थीनीना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्म सालानुसार १८३१ रूपये शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. ज्या मुलींना आईवडील नाही अशा मुलींनाही शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्याचबरोबर मुलींना पुढील शिक्षण घेण्यासाठीही मदत केली जाणार असून एक प्रकाराने पालकत्वही स्विकारण्यात येणार आहे.

## रायगड जिल्हा कारागृहात ‘उज्ज्वल भविष्य’चा उपक्रम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कारागृह, अलिबाग येथे उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था अलिबाग यांना विशेष कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन नारायण जावळे तसेच सचिव जिल्हा व विधीसेवा प्राधिकरण, अलिबाग रायगड तेजस्विनी निराळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या वेळी कारागृहाचे जेलर वारगे साहेब यांचीही प्रमुख उपस्थिती होती तसेच अलिबाग रायगड कारागृहात एकूण १७८ कैदी उपस्थित होते.



कार्यक्रमादरम्यान उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव यांनी कारागृहातील महिला बंदींकरिता दैनंदिन वापराच्या आवश्यक साहित्याचे मोफत वाटप केले होते या सामाजिक जाणिवेच्या उपक्रमाबद्दल जिल्हाधिकारी किशन जावळे साहेब यांनी संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव यांचे विशेष कौतुक करत आभार मानले.

या वेळी जिल्हाधिकारी जावळे साहेब यांनी उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या कार्याची प्रशंसा करत, आगामी एक वर्षासाठी अलिबाग जिल्हा कारागृहातील महिला बंदींकरिता योग व प्राणायाम वर्ग सुरू करण्यास अधिकृत परवानगी दिली. हा उपक्रम त्यांना अत्यंत आवडल्याचे सांगून, पुढील काळातही संस्थेने असेच सामाजिक सहकार्य सुरू ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव, सचिव डॉ.राजाराम हुलवान सर, खजिनदार डॉ. नितिन गांधी सर तसेच संस्थेच्या कार्यकर्त्यांचे आभार मानण्यात आले.

## निवडक

### आडघर येथे सावित्रीबाई फुले जयंती



**माणगाव :** रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आडघर येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक संतोष मोहिते, माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी, अंगणवाडी ताई, कांचन ढेपे, अंगणवाडीसेविका सारिका दसवते तसेच पुनम दसवते, श्रावणी दसवते, पालक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नीलिमा टेबे, पालक, ग्रामस्थ उपस्थित होते. शाळेतील शिक्षकांनी आपल्या भाषणातून स्त्रीशिक्षण, सामाजिक समता व अंधश्रद्धा निर्मूलनासाठी सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या कार्याचा गौरव केला.

### उतेखोलवाडीत सावित्रीबाईंना वंदन



**माणगाव :** पीएमश्री पीएमश्री उतेखोलवाडी शाळेत शनिवारी (दि.३) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. सावित्रीबाई फुलेच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ झाले. मुले वेशभूशेत उपस्थित राहून सावित्री मातेवीशी आपले मनोगत व्यक्त करत होते. कार्यक्रमांस केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

### विकास कॉलनीत सावित्रीबाई फुले जयंती



**माणगाव :** राजिप विकास कॉलनी शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. इ.१ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आपले मनोगत व्यक्त केले. केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी विद्यार्थ्यांना सावित्रीबाईच्या जीवनावर मार्गदर्शन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका पूर्वा येलवे व उपशिक्षिका निलम गायकवाड यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले होते.

### नळेफोडी येथे सावित्रीबाईंना अभिवादन

**माणगाव :** तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नळेफोडी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक अनिल नाचपल्ले यांनी उपस्थितांचे स्वागत केले. शाळेतील सर्व मुलींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा परिधान करून त्यांच्या विचारांचा जिवंत प्रत्यय उपस्थितांना दिला. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश धोंडू भावे, उपाध्यक्ष प्रमिला भावे, अंगणवाडी सेविका सुचिता महादे, मदतनीस अन्वीशा तुपट, पालक सलोनी लोखंडे, हरिश्चंद्र गौरू महादे, निशा नरेश तुपट आदी उपस्थित होते.



## चौक येथे विविध शिबिरांचे आयोजन

**चौक : प्रतिनिधी**

पत्रकार दिनाचे (दि.६ जानेवारी) औचित्य साधून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ खालापूर यांच्या वतीने विविध शिबिरे आयोजित केली असून त्याचा लाभ घेण्यात यावा, असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, पाताळगंगा व रिलायन्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खास महिलांसाठी मूलभूत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. प्रख्यात डॉक्टर उपस्थित राहणार आहेत.

खालापूर तहसील कार्यालय यांच्या वतीने नवीन आधार कार्ड, आधार कार्ड अपडेट, रेशन कार्ड दुय्यम प्रत, तर ग्रामीण रुग्णालय चौक यांच्या वतीने कुपोषित माता बालक यांची तपासणी करण्यात येणार आहे. या वेळी संघाच्या वतीने पौष्टिक आहार वाटप, मोफत औषधे देण्यात येतील, हे शिबिर ग्रामीण रुग्णालय चौक व ज्येष्ठ नागरिक सभागृह तुपगाव चौक येथे आयोजित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे निसर्ग संवर्धनसाठी वृक्षरोपण करण्यात येईल. सकाळी ९.३० वाजता शिबिराचा शुभारंभ होईल, याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा अध्यक्ष राकेश खराडे व तालुका अध्यक्ष अर्जुन कदम यांनी केले आहे.

## श्री चंडिकादेवी महोत्सव उत्साहात

**तळा : प्रतिनिधी**

तळयाची ग्रामदेवता श्री चंडिका देवी पुनः दर्शन सोहळ्याला भक्तांची मांदीयाळी २ जानेवारी रोजी सकाळी श्रीचंडिका देवी पाळखी सोहळा श्रीकांत वेदक यांच्या घरापासून सुरू झाला सुरू झाला हा सोहळा म्हणजे पुर्ण तळा भक्तीमय वातावरणात न्हावून गेला होता.

या पालखी सोहळ्यात तुळजापूरची तुळजाभवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, महूरगडची रेणूका देवी, नाशिकची सप्तश्रृंगी देवी असे विविध देखाव्यांसह अश्वनृत्य यामध्ये भक्तगण मोहून गेले होते. हे हुबेहुब वाटणारे देखावे सर्वांचे आकर्षण ठरले होते.सायंकाळी आशिर्वाद महिला मंडळ राणेचीवाडी (गोळे आळी) यांचे सौजन्याने ठेवलेल्या हळदीकुंकू समारंभाला मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती. दिलेले वाण महिलांचे आकर्षण ठरले. रात्री झालेल्या भक्तीमय कीर्तनात भक्तगण तल्लीन झाले होते. पुर्ण तळा शहरात भक्तीमय वातावरण भक्तांची झालेली गर्दी ही मोठ्या तिर्थक्षेत्राठिकाणी होते. त्याप्रमाणे झाल्याची पहावयास मिळाली.

३ जानेवारी रोजी सकाळी काकड आरती, अभिषेक, पूजा, होम झाल्यानंतर ११.३० वाजता बारा वाड्यांच्या विविध वाद्ये वाजवत, भजन म्हणत व विविध वेशभूषा करून मोठ्या आनंदात भक्तीमय वातावरणात दिंड्या श्रीचंडिका देवी मंदिरात पोहचल्या हा दोन दिवसीय सोहळा विविध कार्यक्रमांनी भक्तीमय वातावरणात साजरा झाला. यावर्षी मोठ्या प्रमाणात लागलेली भक्तगणांची उपस्थिती हे एक विशेष आहे.

## नवघर येथे बालिका दिनानिमित्त बालविवाहमुक्त महाराष्ट्र संकल्प

**पाली : प्रतिनिधी**

बालिका दिनानिमित्त सुधागड तालुक्यातील नवघर शाळेत ’लेक शिकवा अभियान’ प्रारंभ आणि बालविवाह मुक्त महाराष्ट्र संकल्प कार्यक्रमांतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध घोषणा जसे बालपण वाचवा–बालविवाह घालवा, मुलगी शिकली–प्रगती झाली दिल्या गेल्या तसेच बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा घेतली गेली.

शाळेतील विद्यार्थीनी सावित्रीबाई फुले यांच्या वेषात सज्ज होऊन आपले मनोगत, गाणी, चारोळ्या व्यक्त केल्या, तर मुले महात्मा जोतिराव फुले यांच्या वेषात येऊन त्यांचे विचार मांडले. सखी सावित्री समितीच्या सदस्या, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, शाळेतील सर्व महिला शिक्षिकांनी आपले मार्गदर्शन केले.

या वेळी सर्वांनी सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करून ’लेक शिकवा अभियान’चा शुभारंभ केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक संगीता बैकर ह्यानी विद्यार्थ्यांना प्रबोधनपर भाषण करून मार्गदर्शन करून कार्यकमाचे महत्त्व सांगितले.



## प्रवासवर्णन लेखन स्पर्धेत राजेंद्र अंबिके द्वितीय

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागामार्फत व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या वतीने शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी आयोजित करण्यात आलेल्या विभागस्तरीय ’प्रवास वर्णन’ स्पर्धेत राजेंद्र अंबिके यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर व रायगड या पाच जिल्ह्यांतील स्पर्धकांमधून त्यांनी द्वितीय क्रमांक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे.

शिक्षणातील गुणवत्ता संवर्धन तसेच शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून एक महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. शिक्षकांना २१व्या शतकातील आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करण्यासाठी तसेच शैक्षणिक व प्रशासकीय कौशल्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने या स्पर्धा तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर घेण्यात आल्या.

या उपक्रमांतर्गत आयोजित ’प्रवास वर्णन लेखन’ या विभागस्तरीय स्पर्धेत राजेंद्र अंबिके यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अंबिके हे रायगड जिल्हा परिषद शाळा, चोपडेवाडी पण सध्या आदर्श शाळा नवघर, ता. सुधागड येथे कार्यरत असून त्यांनी सादर केलेल्या सिंगापूर अभ्यासदौरा प्रवासवर्णन लेखनाने परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. राज्यस्तरीय स्पर्धेत मुंबई विभागाचे नेतृत्व करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली आहे.

## माणगावात पहाटेपासून दाट धुके

**माणगाव : बातमीदार**

माणगांव–उतेखोल परिसरासर संपूर्ण रागयड जिल्ह्यात शनिवार ३ जानेवारी रोजी पहाटेपासून दाट धुक्याची चादर पसरली होती. सकाळी दहा वाजेपर्यंत सूर्यनारायणाचे दर्शन झाले नाही. धुके दाट असले तरी थंडीची तीव्रता मात्र तुलनेने कमी जाणवत होती.

विशेषतः काळ नदीच्या सानिध्यामुळे पहाटे आणि सकाळच्या सुमारास दृश्यमानता मोठ्या प्रमाणात घटली होती. रस्त्यावर समोरून येणारी वाहने व पादचारी अगदी जवळ आल्यानंतरच दिसत होते, तर काही क्षणातच नजरेआड होत होते. पायवाटा व रस्ते धुक्यात हरवल्याचे दृश्य पाहायला मिळाले. मॉर्निंग वॉकसाठी तसेच कामानिमित्त बाहेर पडलेल्या नागरिकांना या धुक्याचा अनुभव आला.



### सकाळी 10 वाजेपर्यंत सूर्यदर्शन नाही

यंदा हिवाळ्यात सायंकाळपासून सकाळपर्यंत थंडी जाणवत असून दिवसभर आकाशात मळभ आणि पावसाचे संकेत दिसून येत आहेत. या हवामानामुळे कडधान्य शेती जोमदार होईल, असे भाकीत शेतकरी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.

वाल, मूग, मटकी तसेच मटार, मुळा, मेथी यांसारख्या भाजीपाला पिकांसाठी हे हवामान अनुकूल ठरत आहे. तसेच आंब्याला मोहर व फणसाला कुयऱ्या लागण्यासाठीही पोषक वातावरण असल्याचे सांगण्यात येते, मात्र अतीधुके आंब्याच्या मोहरावर विपरीत परिणाम करू शकते, असे मत जाणकार शेतकऱ्यांनी व्यक्त केले.

गतवर्षीच्या तुलनेत यंदाचा हिवाळा आतापर्यंत सुखावणारा ठरत आहे. तथापि, मुंबईत अलीकडे पडलेल्या पावसामुळे परिसरात मळभ दाटले की ‘हिवाळ्यात पाऊस पडतो की काय?’ अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोहपे, तहसील– पनवेल, जिल्हा– रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार सीमा वेंकट अय्यर, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे मोहपे, तहसील पनवेल जिल्हा रायगड परिषद रायगड, पंचयात समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| २१/२ | १ | ०.२४.५० | ०.०२.३० | ०.२६.८० | ५.६९ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०४/०१/२०२६

सही/–
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
( खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६. मोबाईल : ८८८८२७१७५९

# भाजप महायुतीचा थेट मतदारांशी संवाद

## पनवेल प्रभाग क्रमांक १८मध्ये जोरदार प्रचार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १८ मध्ये भाजपा महायुतीच्या उमेदवार सौ.प्रीती जॉर्ज (म्हात्रे) यांच्या प्रचाराला वेग आला असून भारतीय जनता पक्ष युतीला आघाडी मिळताना दिसत आहे. या प्रचाराचा भाग म्हणून भाजप महायुती महिला आघाडीच्या महिला कार्यकर्त्यांनी प्रभागात घराघरांत जाऊन मतदारांची भेट घेतली.



या प्रचारावेळी पनवेल महानगरपालिकेतून बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेविका ममता प्रितम म्हात्रे या उपस्थित होत्या. त्यांच्या सोबत महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उमेदवारांच्या प्रचारार्थ मतदारांशी संवाद साधत भाजपाच्या विकासाभिमुख धोरणांची माहिती दिली.

पनवेल शहरात भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून सुरू असलेली विकासकामे, नागरी सुविधांचा विस्तार तसेच भविष्यातील विकास आराखडा याबाबत मतदारांना माहिती देण्यात आली. महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी विशेषतः महिला मतदारांशी संवाद साधत त्यांचे प्रश्न व अडचणी जाणून घेतल्या.

या प्रचार दौऱ्याला नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून प्रभाग क्रमांक १८ मध्ये भाजपच्या कार्यपद्धतीवर जनतेचा विश्वास अधिक दृढ होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. एकजुटीने आणि संघटनात्मक ताकदीच्या जोरावर भाजप महायुतीचा प्रचार प्रभावीपणे सुरू असल्याचे या दौऱ्यातून स्पष्ट झाले.

या वेळी भाजप ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, आमदार विक्रांत पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक नितीन पाटील भाजपचे स्थानिक पदाधिकारी आणि महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येत उपस्थित होत्या.

# निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना धमकी

## घणसोलीत गुन्हा दाखल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील आठही निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमध्ये निवडणूकविषयक कामकाज सुरू आहे, मात्र या प्रक्रियेदरम्यान घणसोली विभागात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना धमकी दिल्याचा प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घणसोली विभागाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी कल्पना गोडे या निवडणूकविषयक कर्तव्य बजावत असताना एका व्यक्तीकडून त्यांच्यावर दबाव टाकण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्राथमिक माहितीनुसार संबंधित व्यक्तीने निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

घणसोली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, संबंधित व्यक्तीने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या खासगी मोबाईल क्रमांकावर तसेच व्हॉट्सॲपद्वारे संपर्क साधून धमकी दिल्याचे सांगण्यात आले आहे. यासोबतच समाजमाध्यमांवर त्यांच्याविषयी द्वेषपूर्ण आणि बदनामीकारक मजकूर प्रसारित करण्यात आल्याचा उल्लेख तक्रारीत आहे. या प्रकारामुळे निवडणूक कामकाजात अडथळा निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

या घटनेनंतर घणसोली विभागाच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्या तक्रारीच्या आधारे संबंधित व्यक्तीविरोधात फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिसांकडून प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

निवडणूक प्रक्रियेच्या अंमलबजावणीदरम्यान कोणतेही बेकायदेशीर कृत्य अथवा गैरप्रकार सहन केले जाणार नाहीत, असे प्रशासनाकडून नमूद करण्यात आले आहे. यानिमित्ताने निवडणूक विभागाच्या वतीने सर्व नागरिक, राजकीय पक्ष, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना कायद्याचे पालन करून निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि सुव्यवस्थितरीत्या पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून पोलिसांच्या चौकशीनंतर पुढील कारवाई करण्यात येईल असे पोलीस अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

# वर्षभरात जेएनपीएची कंटेनर हाताळणीत १२.६४ टक्के वाढ



**उरण : वार्ताहर**

भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने २०२५ वर्षामध्ये माल हाताळणीत वाढ झाली आहे. पंचांग वर्ष २०२५ मध्ये जेएनपीएमध्ये कंटेनर हाताळणी ७.९४ दशलक्ष टीईयू इतकी झाली असून, २०२४ मधील ७.०५ दशलक्ष टीईयूच्या तुलनेत यात १२.६४ टक्के लक्षणीय वाढ नोंदवली आहे.

याच कालावधीत एकूण कार्गो हाताळणी ९९.१७ दशलक्ष मेट्रिक टनांवर पोहचली असून, मागील वर्षातील ९०.२७ दशलक्ष मेट्रिक टनांच्या तुलनेत ९.८६ टक्के वाढ झाली आहे. ही उल्लेखनीय कामगिरी जेएनपीएच्या सक्षम पायाभूत सुविधा, तंत्रज्ञानाधारित कार्यपद्धती आणि वाढत्या व्यापार क्षमतेचे स्पष्ट प्रतिबिंब आहे. या पार्श्वभूमीवर, जेएनपीएने वर्षभरातील टर्मिनलनिहाय कामगिरी, माल प्रवाह आणि कार्यात्मक परिणामांचा आढावा घेण्यासाठी भागधारकांची बैठक आयोजित केली.

एनएसएफटीने डिसेंबर २०२५ मध्ये पहिल्यांदाच एक लाख टीईयू पेक्षा अधिक मासिक कंटेनर हाताळणीचा टप्पा गाठला. डिसेंबर २०२५ मध्ये जेएनपीएने ८.९६ दशलक्ष मेट्रिक टन इतकी एकूण मासिक कार्गो हाताळणी नोंदवली, जी ऑगस्ट २०२५ मधील ८.५६ दशलक्ष मेट्रिक टनांच्या आधीच्या उच्चांकाशी तुलना करता लक्षणीय आहे. एनएसडीटीने ११ जहाजांद्वारे २,२१,४५५ मेट्रिक टन सिमेंटची आतापर्यंतची सर्वाधिक मासिक हाताळणी करून नवा विक्रम प्रस्थापित केला.

# संवेदना चॅरिटेबल संस्थेतर्फे एकदिवसीय मराठी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संवेदना चॅरिटेबल संस्थेच्या वतीने ११ जानेवारी २०२६ रोजी आगरी समाज हॉल, पनवेल येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत पद्मश्री कृषीऋषी डॉ. सुभाष पाळेकर गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली विषमुक्त अन्न, शेती, छतशेती व परसबाग या विषयांवर आधारित एकदिवसीय मराठी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर प्रत्येक घरात अन्नपूर्णेची भूमिका निभावणाऱ्या भगिनी, सामान्य नागरिक, शेतकरी, स्वयं-सहायता बचत गट, आरोग्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्था, तसेच कृषी व इतर संबंधित कार्यालयांतील प्रतिनिधींसाठी अत्यंत माफक देणगी मूल्यात आयोजित करण्यात आले आहे. डॉ. सुभाष पाळेकर गुरुजींचे या विषयांवरील सखोल ज्ञान व प्रत्यक्ष अनुभवातून सहभागींसाठी खूप काही शिकण्याची ही एक अनोखी संधी असून, हे शिबिर सर्वांसाठी अत्यंत समृद्ध व प्रेरणादायी ठरणार आहे.

या शिबिराचे आयोजन जरी संवेदना चॅरिटेबल संस्थेतर्फे करण्यात आले असले, तरी सुभाष पाळेकर कृषी जनआंदोलन, रायगड जिल्ह्यातील कार्यकर्ते देखील या उपक्रमात मोलाची भूमिका बजावत आहेत. निरोगी जीवनाची गुरुकिल्ली म्हणजे आपले आरोग्य. घरच्या घरी भाज्या व फळे पिकवून आपले आरोग्य कसे सुदृढ ठेवता येईल, याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन या शिबिरात मिळणार आहे. समाजामध्ये जनजागृतीसाठी राज्य पातळीवर अशा शिबिरांची नितांत गरज आहे.

आपले पालनपोषण करणाऱ्या मातृभूमीचे व निसर्गदेवतेचे ऋण फेडणे व संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे या राज्यस्तरीय शिबिरात जास्तीत जास्त नागरिक व शेतकऱ्यांनी सहभागी होऊन विषमुक्त अन्न चळवळ पुढे नेण्यासाठी योगदान द्यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# उरण नाका येथे नाकाबंदीत १.५६ लाखांचा गुटखा साठा जप्त

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पनवेल शहर पोलिसांनी आपल्या हद्दीत ऑलआऊट व कोंबिंग ऑपरेशन सुरू केले आहे. त्यानुसार मध्यरात्री पोलिसांनी पनवेल शहरातील उरण नाका येथे लावलेल्या नाकाबंदी दरम्यान कारमध्ये लपवून नेला जाणारा एक लाख ५६ हजार रुपये किमतीचा गुटख्याचा साठा जप्त केला आहे.




या कारवाईत पोलिसांनी वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक करून त्यांची कारदेखील जप्त केली आहे. पनवेल शहर पोलिसांनी त्यांच्या हद्दीत ऑलआऊट व कोंबिंग ऑपरेशन सुरू केली आहेत. त्यानुसार पोलिसांनी शहरातील उरण नाका येथे नाकाबंदी करून वाहनांची तपासणी सुरू केली होती.

दरम्यान, मध्यरात्री पनवेल येथून करंजाडेच्या दिशेने जाणारी कार पोलिसांनी तपासणी केली असता त्यात कारच्या मागील सीटवर असलेल्या खाकी रंगाच्या खोक्यात रजनीगंधा सुगंधित पानमसाला, तसेच एका पांढऱ्या रंगाच्या गोणीमध्ये तुलसी रॉयल जाफरानी जर्दा मिळाला.

तसेच या कारच्या डिक्कीमध्ये ७ गोण्यांमध्ये बाजीराव सुगंधी पानमसाला, मस्तानी २१६ प्रीमियर च्युइंग टोबॅको असा एक लाख ५६ हजार रुपये किंमतीचा गुटखा व सुगंधित पानमसाल्याचा साठा आढळून आला. त्यावर पोलिसांनी कारमधील मनीष गोविंद कुमार (वय ४५) व संदीप रामकरण निशाद ऊर्फ संजू या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे या गुटख्याबाबत चौकशी केली असता, त्यांनी हा गुटखा विक्रीसाठी घेऊन जात असल्याचे कबूल केले.

यानुसार पोलिसांनी या दोघांविरोधात गुन्हा दाखल करून अटक केली आहे. त्यांनी हा प्रतिबंधित गुटखा नेमका कुठून आणण्यात आला आणि त्यामागे कोणते रॅकेट कार्यरत आहे, याचा तपास पनवेल शहर पोलीस करत आहेत.

# अच्युत पालव यांच्याकडून मतदान जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

सुलेखनाच्या क्षेत्रात जगभरात लोकप्रिय असणारे, पद्मश्री पुरस्काराने सन्मानित सुलेखनकार अच्युत पालव यांनी नवी मुंबईकर नागरिक असल्याचा अभिमान व्यक्त करीत १५ जानेवारी रोजी होणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका निवडणूकीत मी स्वत: कुटुंबियांसमवेत मतदान करणार असल्याचे सांगत प्रत्येक नागरिकानेही मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन व्हिडीओ चित्रफितीद्वारे केले आहे.

त्याचप्रमाणे यावेळी पहिल्यांदाच बहुसदस्यीय पध्दतीने मतदान होणार असल्याने १ ते २७ क्रमांकाच्या प्रभागातील मतदारांनी अ, ब, क, ड अशा ४ जागांसाठी मतदान करावे व प्रभाग क्र. २८ मधील मतदारांनी अ, ब, क अशा ३ जागांसाठी मतदान करावे असेही आवाहन त्यांनी केले आहे. प्रत्येक नागरिकाने उत्साहाने मतदान करावे आणि लोकशाहीचा उत्सव साजरा करावा, असेही आवाहन पद्मश्री अच्युत पालव यांनी केले आहे.

# नवीन वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, खाऊवाटप

**उरण : बातमीदार**

नवीन वर्षाचे औचित्य साधून अश्विन पाटील क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे उरण तालुक्यातील चिरनेर येथील आश्रम शाळेत खाऊ, शैक्षणिक साहित्य आणि इतर गरजेच्या अत्यावश्यक वस्तू देऊन नवीन वर्षाची गोड सुरवात करण्यात आली.



या वेळी चंदन भगत, तुषार पाटील, गणेश पाटील, सागर मसुरकर, दिनेश चव्हाण, कुणाल पाटील, कमलेश पिंपळे, सूरज भोईर, साहिल कांबळे, वृषाली पाटील, प्रदिप्ती पाटील, माधुरी पाटील, तेजस्विनी माळगावकर आदी अश्विन पाटील क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे पदाधिकारी सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते. मित्राचा त्याच्या पश्चातही सामाजिक कार्याचा आदर्श कायम ठेऊन मित्र परिवाराने एकत्र येत राबवित असलेल्या व अखंडीतपणे चालू ठेवलेल्या अविरत समाजसेवेचे हे भारत देशातील खूपच दुर्मीळ उदाहरण आहे. समाजात अशी उदाहरणे खूपच कमी प्रमाणात पहावयास मिळतात.

अश्विन पाटील क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे कार्य अश्विन पाटील यांचे मित्र परिवार पुढे नेत असून वेगवेगळे उपक्रम, कार्यक्रम राबवून समाजात जनजागृती करण्याचे काम ही संस्था करीत असल्याने या संस्थेच्या कार्याचे, मित्र परिवाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# बांधणवाडी येथे ग्राममित्र प्रशिक्षणास सुरुवात

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त 'ग्रामसंवर्धन'तर्फे अनोखी मानवंदना

**कळंबोली : बातमीदार**

ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून ग्राम पातळीवर काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांसाठी ग्राममित्र प्रशिक्षणाचेची सुरुवात करून सावित्री बाई फुलेंना अनोखी मानवंदना दिली आहे. ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या बांधणवाडी येथील कार्यालयात झालेल्या या प्रशिक्षणाचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार सुवर्णा दिवेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.



या प्रशिक्षणात ग्राम स्तरावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना ग्रामपंचायत, महसूल, ग्रामविकास, पोलीस, वनविभाग, माहिती अधिकार, आरोग्य यंत्रणा या शासकीय आणि प्रशासकीय यंत्रणांविषयी माहिती देण्यात येणार आहे. तसेच लेखन, वक्तृत्व, नेतृत्व, संवादकौशल्य यांचेही प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ग्राम स्तरावर काम करणारा कार्यकर्ता घडावा या हेतूने ग्राममित्र प्रशिक्षणाची निर्मिती करण्यात आली आहे.

या प्रशिक्षणात रायगड भूषण संतोष ठाकूर, अध्यक्ष-ग्राम संवर्धन सामाजिक संस्था, उदय गावंड, सामाजिक कार्यकर्ते आणि राजेश रसाळ, समन्वयक- ग्राममित्र हे प्रशिक्षण देणार आहेत. तसेच ३३ ग्राममित्र प्रशिक्षणात सहभागी झाले आहेत. ग्राममित्र प्रशिक्षणाचा कालावधी ३ महिन्यांचा असून प्रत्येक रविवारी हे प्रशिक्षण होणार आहे. समाजासाठी झटणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून ग्राम स्तरावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी ग्राममित्र प्रशिक्षणाचे उदघाटन करून अनोखी आदरांजली वाहण्यात आली. उद्घाटन सत्रामध्ये सहभागी कार्यकर्त्यांना आदर्श गाव संकल्पनेविषयी माहिती देण्यात आली.

या वेळी ज्येष्ठ पत्रकार सुवर्णा दिवेकर यांनी सावित्रीबाईंच्या आदर्श लक्षात घेता समाज विकासाच्या या कार्यक्रमात महिलांनी सर्वाधिक सहभाग घ्यावा, असे आवाहन करीत सदर प्रशिक्षणादरम्यान किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी कोणत्याही शासकीय कार्यालयात कामासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

या सत्राचे प्रास्ताविक ग्राममित्रचे समन्वयक राजेश रसाळ यांनी केले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, सध्या गाव पातळीवर राजकीय पुढारी आणि कार्यकर्त्यांची मक्तेदारी असल्यासारखे वातावरण असल्यामुळे ज्याची सरशी त्याची खुर्ची अशा पद्धतीने गावांमध्ये विविध गटतट निर्माण होत आहेत ज्यामुळे गावाचा सर्वसमावेशक पद्धतीचा विकास होताना दिसत नाही त्यामुळे ग्राममित्रच्या प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थी गावातील ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्न करतील असा विश्वास वाटतो. म्हणून जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी प्रशिक्षणात सहभागी व्हावे असे आवाहन ठाकूर यांनी या वेळी केले.

या वेळी रूपेश कदम, ॲड.समीर भालेकर उमेद अभियान प्रभाग समन्वयक भावना पाटील, पाणलोट क्षेत्र विकास तज्ञ श्रीकांत म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते. तर प्रशिक्षण समन्वयक राजेश रसाळ, राजू पाटील, सचिन पाटील, रणजीत पाटील यांनी ह्या प्रशिक्षणाचे व्यवस्थापन केले.

# वाशिवलीत विद्यार्थ्यांनी भरवला आठवडा बाजार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील वाशिवली येथील शनिवारी (दि.३) सौ विमलताई पारनेकर प्राथमिक विद्यामंदिर शालेय विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार भरविण्यात आला.

आठवड बाजाराचे उद्घाटन पालकांच्या हस्ते करण्यात आले. सौ विमलताई पारनेकर प्राथमिक विद्यालयातील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार भरण्यात आला होता. यामध्ये खाऊचे स्टॉल स्टेशनरी पालेभाज्या फळभाज्या, भेल, बिस्किटे, मंचूरन, आदी पदार्थ ठेवण्यात आले होते. कार्यक्रमासाठी शाळेचे अध्यक्ष तुळशीदास पाटील व मुख्याध्यापिका मिनाक्षी मिलिंद रणदिवे यांच्या नेतृत्वाखाली शालेय शिक्षक कल्पना द.गव्हाणे, लहू ना.वारगुडे, संजीवनी अ.म्हात्रे, अंजू शिंदे, दिपा पाटील, अर्पणा जाधव, निकीता म्हात्रे आदींसह पालक शाळा व्यवस्थापन समिती आजी-माजी पालक यांनी विशेष सहकार्य केले.



# श्रीवर्धनमध्ये उपनगराध्यक्षपदासाठी कसोटी

## संख्याबळ विरुद्ध राजकीय प्रभाव : १२ जानेवारीला निवड

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन नगर परिषदेतील उपनगराध्यक्षपदाची निवडणूक आता केवळ औपचारिक प्रक्रिया न राहता ती थेट सत्तासमीकरण, पक्षीय प्रतिष्ठा आणि भविष्यातील राजकीय दिशा ठरवणारी लढत बनली आहे. १२ जानेवारी रोजी होणाऱ्या या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय हालचालींना विलक्षण वेग आला असून प्रत्येक पक्ष आपली रणनीती काटेकोर आखताना दिसत आहे.

या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे थेट नगराध्यक्षपद शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे असताना नगर परिषदेतील संख्याबळ मात्र राष्ट्रवादी काँग्रेसकडे स्पष्ट बहुमताचे आहे. त्यामुळे प्रशासनाची सूत्रे आणि राजकीय नियंत्रण यामध्ये एक वेगळीच तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे.

नगराध्यक्षपद आपल्या ताब्यात असल्याने उपनगराध्यक्षपदासाठीही शिवसेना उबाठा उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचे शहरप्रमुख सावन तवसाळकर यांनी स्पष्ट केले आहे.

नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष हे प्रशासनाचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. शहराचा सर्वांगीण आणि समन्वयाने विकास साधायचा असेल, तर दोन्ही पदे एकाच पक्षाकडे असणे गरजेचे आहे, असा ठाम दावा त्यांनी केला. दरम्यान, संख्याबळ कमी असले तरी नगराध्यक्षपदाचा नैतिक, प्रशासकीय आणि राजकीय प्रभाव उपनगराध्यक्ष निवडणुकीत निर्णायक ठरू शकतो, अशी चर्चा राजकीय जाणकारांमध्ये सुरू आहे.

दुसरीकडे नगर परिषदेत १५ नगरसेवकांचे संख्याबळ असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उपनगराध्यक्षपदासाठी चार इच्छुक नेत्यांची नावे चर्चेत असल्याने पक्षांतर्गत समीकरणे अधिक गुंतागुंतीची झाली आहेत. योग्य उमेदवारावर एकमत न झाल्यास अंतर्गत नाराजी, गटबाजी किंवा अप्रत्यक्ष राजकीय संदेश जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### भाजपची भूमिका निर्णायक

***भाजपकडे जरी फक्त दोन नगरसेवक असले तरी अत्यंत चुरशीच्या या निवडणुकीत त्यांची भूमिका निर्णायक ठरू शकते. राष्ट्रवादीला पाठिंबा द्यायचा की शिवसेनेशी समन्वय साधायचा अथवा तटस्थ राहून राजकीय संदेश द्यायचा, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.***

या पार्श्वभूमीवर वरिष्ठ पातळीवर बैठका, सल्लामसलत आणि सामंजस्याचे प्रयत्न सुरू असून पक्षाची एकजूट राखणे हे राष्ट्रवादीसमोर मोठे आव्हान ठरले आहे.

नगराध्यक्ष शिवसेनेचा आणि उपनगराध्यक्ष राष्ट्रवादीचा झाल्यास सत्तेचे संतुलन राखले जाईल, मात्र विकासकामांची गती आणि निर्णयप्रक्रियेत सुसूत्रता राखण्यासाठी दोन्ही पदे एकाच पक्षाकडे असावीत, असा शिवसेनेचा ठाम दावा आहे.

१२ जानेवारी रोजी होणाऱ्या विशेष सभेत नामनिर्देशन प्रक्रिया आणि आवश्यक असल्यास मतदान पार पडणार आहे. याच दिवशी श्रीवर्धन नगर परिषदेची पुढील राजकीय दिशा, सत्तासमीकरणे आणि प्रशासनाची वाटचाल स्पष्ट होणार आहे.

ही निवडणूक केवळ एका पदापुरती मर्यादित न राहता आगामी काळातील विकासकामांचा वेग, पक्षीय प्रभाव आणि शहराच्या राजकारणाचे स्वरूप ठरवणारी ठरणार असल्याने संपूर्ण श्रीवर्धन शहराचे लक्ष या निवडीकडे लागले आहे. श्रीवर्धन नगर परिषदेत सध्याची पक्षीय स्थिती राष्ट्रवादी काँग्रेस १५ नगरसेवक, शिवसेना तीन नगरसेवक आणि भाजप दोन नगरसेवक अशी आहे.

## माटवण येथे आपत्ती निवारण शेडचे भूमिपूजन



**पोलादपूर : प्रतिनिधी**

२०२१च्या आपत्कालीन परिस्थितीत मदतीला कोण कोण आले, त्या मदतीसाठी धावणाऱ्यांची जाणीव आगामी काळात येणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीदरम्यान ठेवा, असे आवाहन राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले यांनी केले.

पोलादपूर तालुक्यातील माटवण येथे नैसर्गिक आपत्ती अंतर्गत निवारा शेडचे भूमिपूजन मंत्री गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास शिवसेना शिंदेगट जिल्हा सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, ज्येष्ठ शिवसैनिक दशरथ उतेकर, कृउबा संचालक लक्ष्मण मोरे, उपतालुकाप्रमुख शौकत तारलेकर, हर्षल सातपुते तसेच शिवसैनिक आणि महिला आघाडी कार्यकर्ते उपस्थित होते.

या निवाराशेडमुळे भविष्यात नैसर्गिक आपत्तीच्या काळात स्थानिक नागरिकांना सुरक्षित आश्रय मिळणार असून आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम होणार आहे. शासन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कटिबध्द असल्याचे मंत्री गोगावले यांनी या वेळी सांगितले.

## रोहा बौद्ध महासभेकडून ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**रोहा : प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा रोहा तालुक्याच्या वतीने भारतीय पहिल्या शिक्षिका, मुख्याध्यापिका, स्त्री शिक्षणाचा प्रणेत्या, विद्येची जननी, समस्त स्त्रियांनी उजेडाची वाट दाखवण्याऱ्या, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती अष्टमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात साजरी करण्यात आली.

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर जिल्हा सचिव राजश्री जाधव, संस्कार उपाध्यक्ष शर्मिला तांबे, ज्योत्स्ना वाघमारे यांनी सखोल मार्गदर्शन केले. जिल्हा माजी सचिव, बौद्धाचार्य, केंद्रीय नेते शांतिशिल तांबे, जिल्हा कार्यालय सचिव संतोष साळवी, तालुका अध्यक्ष रवींद्र आयनोडकर यांनी मार्गदर्शन करताना त्यागामुळे, शिक्षणाची दारे उघडून प्रत्येकाची व देशांच्या प्रगतीत फुले दाम्पत्याचा सिंहाचा वाटा आहे, असे सांगितले

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका महिला विभाग अध्यक्ष प्रतिभा शिंदे, जान्हवी तांबे, कोषाध्यक्ष लता कांबळे, निशा उंदरे, जयश्री शिंदे, भाग्यश्री आयनोडकर, केशव उंदरे, बबन भोसले, उत्तम इंगोले, जनार्दन वाघमारे, मनोहर शिंदे, तुळशीराम शिंदे, पांडुरंग जाधव यांनी मेहनत घेतली. तालुका सरचिटणीस दीपक शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, तर उपस्थितांचे आभार तालुका कोषाध्यक्ष राजेश जाधव यांनी मानले.

## मोरे महिला महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती

**रोहा : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे फाऊंडेशनचे वरदा सुनील तटकरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव रोहा येथे शनिवारी (दि. ३) भारतातील पहिल्या महिला शिक्षिका, कवयित्री व थोर समाजसुधारिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.





कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या वेळी महाविद्यालयाच्या इतिहास विभाग प्रमुख प्रा. माधुरी जाधव आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. प्रतिमा भोईर तसेच सर्व शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रास्ताविक भाषणात प्रा. माधुरी जाधव यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा संक्षिप्त आढावा मांडला. सावित्रीबाईंनी १९व्या शतकात सामाजिक विरोध, अपमान व अडचणींना तोंड देत स्त्रीशिक्षणाची चळवळ उभी केली, हे विशेषत्वाने अधोरेखित केले. शिक्षण हेच स्त्री मुक्तीचे प्रभावी साधन आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कार्यातून दिला, असे त्यांनी नमूद केले.

या वेळी तृतीय वर्ष कला या वर्गातील वैष्णवी मोकल विद्यार्थिनीने सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक व स्त्रीसुधारणा विषयक कार्यावर प्रभावीपणे विचार मांडले. उपस्थित सर्वांनी सावित्रीबाईंच्या विचारांचा अंगीकार करण्याचा संकल्प केला.

## ‘पोटाच्या भुकेसाठी बाहेर पडताना डोक्याच्या भुकेसाठीही पुढे या’



**रोहा : प्रतिनिधी**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी लढा दिला म्हणून आज मुली शिकू लागल्या आहेत. शेणगोटे त्यांनी अंगावर घेतले म्हणून आज आम्ही शिकलो आहोत. गावातील, शहरातील चावडीचा ताबा महिलांनी घेणे आवश्यक आहे. त्यांनी आपला आवाज उठवला पाहिजे. पोटाच्या भुकेसाठी बाहेर पडत असताना डोक्याच्या भुकेसाठीही पुढे येण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांनी केले.

सर्वहारा जन आंदोलनाच्या वतीने चावडी सावित्री, फातिमाची जन-गण-मन अभियान अंतर्गत रोहा कुंडलिका नदी संवर्धन येथील छत्रपती शिवाजी महाराज यांना वंदन करून रोहा शहरात रॅली काढण्यात आली होती. रॅलीच्या समारोपप्रसंगी महाजन यांनी विचार मांडले.

कार्यक्रमास कार्याध्यक्ष चंद्रकांत गायकवाड, सचिव सोपान सुतार, शशिकांत जगताप, राष्ट्रवादीचे रोहा तालुका अध्यक्ष तुषार खरीवले, चंदा तिवारी, गुलाब वाघमारे, बेबी कापरे, जनाताई, नयना आर्दीसह मोठ्या प्रमाणात आदिवासी, बहुजन समाज उपस्थित होता.

या वेळी कार्याध्यक्ष चंद्रकांत गायकवाड म्हणाले की, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या मागे क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले असल्याने सावित्रीबाईना शिकता आले. त्यांनी महिलांना शिकण्यासाठी पुढाकार घेतला. ज्ञानज्योती सावित्रीमाईंचे आदर्श सर्वांनी घ्यावे. त्यांच्यामुळेच आज महिला सन्मानाने जगत असून विविध पदांवर काम करीत आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा चालवत त्यांचे विचार आपण सर्वांनी आत्मसात करून आचरणात आणले पाहिजेत.

शशिकांत जगताप यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी विचारांची क्रांती घडवली असल्याचे सांगितले, तर जनाताईंनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यामुळे आम्ही शिकलो असल्याचे सांगितले. बेबी कापरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात महाजन, वाघमारे आणि कापरे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावर गीत सादर केले.

चावडीच्या आधी रोहा शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत उपस्थितांनी आमचा लढा न्यायासाठी, भारतीय संविधानाचा विजय असो, संविधान बचाव, माणुसकीची भिक नको, हक्क हवा हक्क हवा, आदिवासी ढोर नाय माणूस हाय यासह महापुरुषांच्या घोषणा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोपान सुतार यांनी केले.

## बालविवाह जनजागृती कार्यक्रम



**नेरळ :** जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग तसेच भाऊसाहेब राऊत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कशळे यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व बालिका दिनाचे औचित्य साधून बालविवाहमुक्त भारत अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सुजाता सपकाळ होत्या. या वेळी चाईल्ड हेल्पलाईनचे जिल्हा प्रकल्प समन्वयक प्रकाश पवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत माहिती दिली. कॉलेजच्या प्राचार्य बेडेकर यांनी आपल्या भाषणात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रा. उज्वला पाटील यांनी सामाजिक कार्याचे महत्त्व विशद केले. उपस्थितांचे आभार खंडागळे मॅडम यांनी केले.

## कर्जत तालुक्यातील क्रांतीच्या लढ्याने जिल्ह्याचे नाव उज्ज्वल -खासदार तटकरे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात देशाच्या स्वातंत्र्याचा लढा उभा राहिला आणि त्यात दोन क्रांतिकारकांना हौतात्म्य प्राप्त झाले. या इतिहासाने केवळ कर्जत तालुक्याचे नाही तर रायगड जिल्ह्याचे नाव सुवर्ण अक्षरांनी लिहिले आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी येथे केले.



हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील या भारतमातेच्या दोन सुपुत्रांना अभिवादन करण्यासाठी नेरळ येथील हुतात्मा चौकात सिद्धगड बलिदान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हुतात्म्यांच्या अर्धपुतळ्याला खासदार सुनील तटकरे यांचे हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर रायगड जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीमधून बांधण्यात आलेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे लढ्याचे शिल्पाचे लोकार्पण खासदार तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे माजी सभापती पुंडलिक पाटील, अशोक भोपतराव, कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती एकनाथ धुळे, रामचंद्र ब्रह्मांडे, माजी सरपंच भगवान चंचे, निवृत्त कर्नल डॉ. कुशाग्र पटेल यांच्यासह दीपक श्रीखंडे, ॲड. रंजना धुळे, कृषिभूषण शेखर भडसावळे, शरद भगत, निवृत्त जवान कुमार जाधव, अर्जुन शिंदे, मधुकर घारे, नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल वरोटे, ग्रामपंचायत प्रशासक सुजित धनगर, ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले आदी उपस्थित होते.

खासदार सुनील तटकरे यांनी हुतात्मा भाई कोतवाल व हुतात्मा हिराजी पाटील यांच्या बलिदानाची आठवण करून देत स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे योगदान आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

हुतात्मा स्मारक समिती अध्यक्ष संतोष पेरणे यांनी प्रास्ताविक केले. तर समितीचे सदस्य विजय मांडे, दर्वेश पालकर, अभिषेक कांबळे, मल्हार पवार, किशोर गायकवाड, रामदास माळी, महेश भगत, नितीन पारधी, बंटी शिर्के, विपुल माळी, मनोज भोईर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. महाराष्ट्र राज्यगीत गायक केदार खडे यांनी सादर केले.

पत्रकारांची समाजसेवी संस्था असलेल्या हुतात्मा स्मारक समितीच्या विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात हुतात्मा गौरव पुरस्कारांचे वितरण खासदार तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. इतिहास अभ्यासक व लेखक मुरबाड तालुक्यातील गिरीश कंटे आणि बदलापूर वांगणी येथे पाणवठा हे प्राण्यांचे अनाथाश्रम चालविणारे गणराज जैन यांचा सन्मान करण्यात आले. या वेळी स्वातंत्र्यसैनिक आणि हुतात्म्यांचे नातेवाईक शेखर भडसावळे, शरद भगत, संध्या देवस्थळे, शशिकांत पाटील उपस्थित होते. मानिवली आणि जुम्मापट्टी शाळेतून आलेल्या विद्यार्थ्यांनी हुतात्म्यांच्या जीवनावर भाषणे केली. माथेरानचे नगरसेवक प्रतिभा घावरे, किरण पेमारे, सचिन दाभेकर, सीताराम कुंभार यांचा सत्कार करण्यात आला.



**मुरुड : खोरा बंदर परिसरात डोंगरी गावाखाली समुद्रकिनारा विकासाच्या प्रतीक्षेत आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र –अमित घाग

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धामणसई मराठी शाळेत दै. रामप्रहरचे पत्रकार जितेंद्र जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक भान जपत एक स्तुत्य शैक्षणिक उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाळेतील ११० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात भाजपाचे तालुकाध्यक्ष अमित घाग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अमित घाग म्हणाले, मुले ही देशाची खरी संपत्ती आहेत. स्वतःच्या पायावर खंबीर उभे राहण्यासाठी नियमित अभ्यास, शिस्त आणि पुस्तकाशी मैत्री आवश्यक आहे. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी नव्हे, तर जीवन घडवण्यासाठी आणि समाज बदलण्यासाठीचे सर्वात मोठे शस्त्र आहे. आज शिक्षकांच्या हातून मिळालेले शैक्षणिक साहित्य उद्या विद्यार्थ्यांच्या यशाचा पाया ठरेल.

शाळेला भविष्यात जे काही सहकार्य लागेल, ते निश्चितपणे उपलब्ध करून दिले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. तर तालुक्यातील एका पत्रकाराच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शैक्षणिक उपक्रम राबवला जाणे ही प्रेरणादायी बाब असल्याचे या वेळी अनेकांनी नमूद केले.

पत्रकार जितेंद्र जाधव म्हणाले, मुलांना योग्य शैक्षणिक वातावरण, प्रेरणा आणि संधी मिळाल्यास त्यांचे व्यक्तिमत्त्व निश्चितच फुलते. आजचा हा आनंददायी उपक्रम विद्यार्थ्यांच्या आशीर्वादातून पुढील सामाजिक कार्यासाठी नवी ऊर्जा देणारा ठरेल.

कार्यक्रमास धरनेश दारला, दक्षिण भारतीय सेलचे पदाधिकारी कुणाल आमले, प्रतिष्ठित नागरिक दिनेश रटाटे, माजी सरपंच शंकर काते, माजी उपसरपंच राया फसाळे, सुरेश वाघमारे, वरणकर बाबा, शाळा समितीचे पदाधिकारी, मुख्याध्यापक भोईर, शशिकांत शेळके, कृष्णा नाकती, अनिल नजन, उषा मिसाळ तसेच ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.

# वैभव सूर्यवंशीचा भीमपराक्रम

**बेनोनी : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटमधील उगवता तारा वैभव सूर्यवंशी याने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंडर-१९ पहिल्या युवा एकदिवसीय सामन्यात मैदानावर पाऊल ठेवताच जागतिक क्रिकेटमध्ये खळबळ उडवून दिली. वयाच्या अवघ्या १४व्या वर्षी भारतीय १९ वर्षांखालील संघाचे नेतृत्व करत त्याने १९ वर्षे जुना जागतिक विक्रम मोडीत काढला.

बेनोनी येथील विलोमूर पार्क येथे झालेल्या या सामन्यात वैभव सूर्यवंशी हा कोणत्याही फॉरमॅटमध्ये आंतरराष्ट्रीय १९ वर्षांखालील संघाचे नेतृत्व करणारा जगातील सर्वात तरुण खेळाडू ठरला आहे. १६ वर्षांच्या वयाआधी हे शिखर सर करणारा तो पहिलाच क्रिकेटपटू आहे. या कामगिरीसह




त्याने पाकिस्तानच्या अहमद शहजादचा १९ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत काढून इतिहासाच्या पानात आपले नाव कोरले.

युवा भारतीय संघाचा नियमित कर्णधार आयुष म्हात्रे आणि उपकर्णधार विहान मल्होत्रा हे दोघेही दुखापतग्रस्त झाल्यामुळे या तीन सामन्यांच्या मालिकेची धुरा वैभवच्या खांद्यावर सोपवण्यात आली. जरी तो पहिल्या सामन्यात फलंदाजीत विशेष चमक दाखवू शकला नसला (१२ चेंडूत ११ धावा) तरी कर्णधार म्हणून त्याची ही उपस्थिती भारतीय क्रिकेटच्या भविष्यातील मोठ्या बदलाची नांदी मानली जात आहे.

### कमी वयात दबदबा

वैभव सूर्यवंशी हे नाव केवळ कर्णधारपदासाठी नाही, तर त्याच्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखले जाते. विजय हजारे ट्रॉफीमध्ये बिहारकडून खेळताना त्याने अरुणाचल प्रदेशविरुद्ध अवघ्या ३६ चेंडूत शतक ठोकले होते. त्या सामन्यात त्याने ८४ चेंडूत १९० धावा केल्या. यादरम्यान त्याने लिस्ट 'ए' क्रिकेटमध्ये सर्वात जलद १५० धावा करण्याचा दक्षिण आफ्रिकेच्या एबी डिव्हिलियर्सचा विक्रम १० चेंडू राखून मोडला. त्याने एका डावात १५ षटकार मारण्याचा विक्रम केला.

# भारतीय कबड्डी शिबिरामध्ये महाराष्ट्रातील सात खेळाडूंची निवड



**मुंबई : प्रतिनिधी**

चौथी विश्वचषक कबड्डी स्पर्धा आणि आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय वरिष्ठ पुरुष कबड्डी संघाच्या पहिल्या विशेष प्रशिक्षण शिबिरात महाराष्ट्रातील सात खेळाडूंची निवड झाली आहे.

नवी दिल्लीच्या भारतीय क्रीडा प्राधिकरण (साइ) केंद्रात येथे ५ जानेवारी ते ५ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या पहिल्या राष्ट्रीय शिबिरासाठी देशभरातून एकूण ७३ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये आकाश शिंदे, अजित चौहान आणि शिवम पटारे (तिघेही डावे चढाईपटू), जयेश महाजन (डावा कोपरारक्षक), अस्लम इनामदार (अष्टपैलू), आदित्य शिंदे (उजवा चढाईपटू) आणि अजित पवार (डावा मध्यरक्षक) अशा महाराष्ट्राच्या सात खेळाडूंचा समावेश आहे. त्याचबरोबर पूर्वी महाराष्ट्राकडून खेळलेले व सध्या भारतीय रेल्वे संघाकडून निवडण्यात आलेले पंकज मोहिते व शुभम शिंदे यांचीदेखील या शिबिराकरिता निवड झाली आहे.

राष्ट्रीय शिबिर द्रोणाचार्य पुरस्कार विजेते मुख्य प्रशिक्षक बलवान सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार असून अर्जुन पुरस्कार विजेते बी.सी. रमेश सहाय्यक प्रशिक्षक म्हणून, तर अर्जुन पुरस्कार विजेते अनुप कुमार संघ व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत.

चौथ्या विश्वचषक कबड्डी स्पर्धेचा कार्यक्रम अद्याप घोषित झालेला नाही, परंतु आशियाई क्रीडा स्पर्धा १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबरदरम्यान जपानला होणार आहे.

# टी-२० वर्ल्डकपसाठी बांगलादेशचा संघ जाहीर; लिटन दासकडे नेतृत्व

**ढाका : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक २०२६च्या पार्श्वभूमीवर बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) एक अत्यंत अनपेक्षित आणि मोठा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयच्या निर्देशानंतर मुस्तफिजूर रहमानला आयपीएलमधून बाहेर पडावे लागल्याने निर्माण झालेल्या वादाच्या सावटात बांगलादेशने आगामी विश्वचषक स्पर्धेसाठी आपला संघ जाहीर केला आहे. या संघाचे नेतृत्व लिटन दास याच्याकडे सोपवण्यात आले आहे.

आयपीएल २०२६मध्ये कोलकाता नाईट रायडर्सने मुस्तफिजूर रहमानला रिलीज केल्यामुळे बांगलादेश क्रिकेट बोर्डला झटका बसला आहे. शनिवारी बोलावलेल्या आणीबाणीच्या बैठकीत बीसीबीने



मोठा निर्णय घेतला. सूत्रांच्या माहितीनुसार बांगलादेशला त्यांचे विश्वचषकातील सामने भारतात खेळण्याची इच्छा नाही. त्यांनी आयसीसीकडे मागणी केली आहे की, त्यांचे सर्व सामने भारतातून श्रीलंकेत हलवण्यात यावेत, मात्र बीसीसीआयने हॉटेल बुकिंग आणि नियोजित वेळापत्रकाचे कारण देत बदलास नकार दिला आहे.

बांगलादेशमध्ये अलीकडच्या काळात हिंदू अल्पसंख्याकांवर झालेल्या अत्याचाराच्या बातम्यांमुळे वातावरण तापलेले असतानाच क्रिकेट बोर्डाने एका हिंदू क्रिकेटपटूला कर्णधार बनवून सर्वांना चकित केले आहे. लिटन दासने आतापर्यंत २९ टी-२० सामन्यांत बांगलादेशचे नेतृत्व केले आहे, ज्यापैकी १५ सामन्यांत संघाने विजय मिळवला आहे. तो एक कट्टर हिंदू असून सोशल मीडियावर सण साजरे करतानाचे फोटो नेहमीच शेअर करत असतो.

**संघ** : लिटन दास (कर्णधार), मोहम्मद सैफ हसन (उपकर्णधार), तंजीद हसन, मोहम्मद परवेज हुसैन इमोन, तौहीद हृदोय, शमीम हुसैन, काजी नुरुल हसन सोहन, शक महेदी हसन, रिशद हुसैन, नसुम अहमद, मुस्तफिजूर रहमान, तंजीम हसन साकिब, तस्कीन अहमद, मोहम्मद शैफुद्दीन आणि शोरफुल इस्लाम.

# पाचव्या ॲशेस कसोटीत ऑस्ट्रेलिया संघ चक्क फिरकीपटूशिवाय उतरला मैदानात!

**सिडनीचे : वृत्तसंस्था**

सिडनी येथील क्रिकेट ग्राऊंडवर खेळल्या जाणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या आणि अंतिम ॲशेस कसोटीत यजमान ऑस्ट्रेलियाने एकही फिरकीपटू न खेळवण्याचा ऐतिहासिक आणि धक्कादायक निर्णय घेतला. सिडनीच्या मैदानावर तब्बल १३८ वर्षांनंतर पहिल्यांदाच ऑस्ट्रेलियन संघ एकाही मुख्य फिरकीपटूशिवाय मैदानात उतरला आहे. कर्णधार स्टीव्ह स्मिथने हा निर्णय नाईलाजास्तव घ्यावा लागल्याचे मान्य केले आहे.

सिडनीचे मैदान हे ऐतिहासिक दृष्टचा ऑस्ट्रेलियातील फिरकीपटूंचे नंदनवन मानले जाते, मात्र १८८८नंतर पहिल्यांदाच येथे यजमानांनी एकाही 'फ्रंटलाईन' स्लो बॉलरशिवाय खेळण्याचा निर्णय घेऊन जुनी परंपरा मोडीत काढली आहे. पाचव्या कसोटीसाठी अष्टपैलू खेळाडू बो वेबस्टरला संघात स्थान देण्यात आले असून ऑफ-स्पिनर टॉड मर्फीला डच्चू देण्यात आला आहे.

आपल्या निर्णयाबाबत बोलताना ऑस्ट्रेलियाचा कर्णधार स्टीव्ह स्मिथ म्हणाला की, संघात फिरकीपटू न घेण्याचा निर्णय घेताना मला अजिबात आनंद झालेला नाही, पण खेळपट्टी फिरकीला पोषक नसेल, तर तुम्हाला अशा निर्णयांकडे वळावे लागते. सध्या ज्या प्रकारच्या खेळपट्ट्यांवर आम्ही खेळत आहोत, तिथे फिरकीपटूंचा सामना करणे सर्वात सोपे वाटते. वेगवान गोलंदाजांना मदत करणाऱ्या खेळपट्ट्यांवर फिरकीपटू टाकणे धोक्याचे ठरू शकते, कारण फलंदाजांनी आक्रमक पवित्रा घेतल्यास ३०-४० धावा सहज खर्च होतात. खेळाचे पारडे फिरते. मला खेळात फिरकीपटूंना पहायला आवडते, पण सध्याच्या परिस्थितीत त्यांना खेळवण्यात अर्थ दिसत नाही.

दरम्यान, सिडनीमध्ये ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात खेळल्या जाणाऱ्या पाचव्या ॲशेस कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवसाचा खेळ पावसामुळे लवकर संपला. इंग्लंडने पहिल्या डावात तीन गडी बाद २११ धावा केल्या. खेळ संपला तेव्हा हॅरी ब्रुक ७८ धावांसह आणि जो रूट ७२ धावांसह खेळत होते. ऑस्ट्रेलियाकडून मिचेल स्टार्क, मायकेल नेसर आणि स्कॉट बोलंड यांनी प्रत्येकी एक बळी घेतला आहे.

तत्पूर्वी इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दोन्ही संघांनी त्यांच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये प्रत्येकी एक बदल केला. इंग्लंडने गस ॲटकिन्सनच्या जागी मॅथ्यू पॉट्सचा समावेश केला. दरम्यान, झाय रिचर्डसनच्या जागी ब्यू वेबस्टरचा ऑस्ट्रेलियन संघात समावेश करण्यात आला आहे.

### स्पिनर्सच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



ऑस्ट्रेलियाने या मालिकेत फिरकीपटूंना वगळण्याचा कल कायम ठेवला आहे. अनुभवी नॅथन लायनला ब्रिस्बेनच्या दुसऱ्या कसोटीतून डच्चू देण्यात आला होता, तर त्याचा पर्याय म्हणून आलेल्या टॉड मर्फीला मेलबर्न आणि आता सिडनी कसोटीतूनही बाहेर बसावे लागले आहे. दुसरीकडे इंग्लंडनेही आपल्या मुख्य फिरकीपटूला शोएब बशीरला सलग पाचव्या कसोटीत संधी दिलेली नाही. परिणामी बशीर दौऱ्यावर एकही चेंडू न टाकता मायदेशी परतणार आहे.

# मुस्तफिजुरला आयपीएलमधून वगळल्यानंतर बांगलादेशची भारतावर आगपाखड

## आयसीसीकडे धाव!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मुस्तफिजुर रहमानला शनिवारी आयपीएलमधून वगळण्याच्या निर्णयाचा बांगलादेशने तीव्र शब्दांत निषेध केला आहे. अतिरेकी जातीय गटांसमोर नमते घेत भारतीय क्रिकेट बोर्डाने कोलकाता नाईट रायडर्सला (केकेआर) बांगलादेशी क्रिकेटपटू मुस्तफिजुर रहमानला संघातून वगळण्याचे निर्देश दिले आहेत. मी या निर्णयाचा तीव्र निषेध करतो, असे बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे सल्लागार आसिफ नजरुल यांनी फेसबुकवर लिहिले आहे.





नजरुल यांनी पुढे सांगितले की, अंतरिम सरकारने क्रिकेट बोर्डाला या प्रकरणात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) हस्तक्षेपाची मागणी करण्याचा सल्ला दिला आहे, मात्र भारतीय क्रिकेट बोर्ड हे आयसीसीचे महत्त्वाचे घटक असले तरी आयपीएल ही एक देशांतर्गत स्पर्धा आहे आणि त्याच्या प्रशासनावर आयसीसीचे कोणतेही अधिकार नाहीत.

क्रीडा मंत्रालयाचे प्रभारी सल्लागार नजरुल म्हणाले, मी बांगलादेश क्रिकेट बोर्डाला या संपूर्ण प्रकरणाचे स्पष्टीकरण देणारे औपचारिक पत्र आयसीसीला लिहिण्याचे निर्देश दिले आहेत. बोर्डाने स्पष्टपणे नमूद केले पाहिजे की, जर करारबद्ध असूनही एखादा बांगलादेशी क्रिकेटपटू भारतात खेळू शकत नसेल, तर संपूर्ण राष्ट्रीय क्रिकेट संघाने विश्वचषक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तिथे जाणे बांगलादेश सुरक्षित मानू शकत नाही.

बांगलादेशचे विश्वचषक सामने भारताऐवजी श्रीलंकेत आयोजित केले जावेत. याशिवाय बांगलादेशात आयपीएल सामन्यांचे प्रक्षेपण स्थगित करण्यात यावे, अशी विनंती मी माहिती आणि प्रसारण सल्लागारांना केली असल्याचेही नजरुल यांनी म्हटले आहे.

### भारतात टी-२० वर्ल्डकपचे सामने खेळण्यास नकार

पुढच्या महिन्यात भारतात होणाऱ्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत खेळण्यास बांगलादेशने नकार दिला आहे. भारत आणि श्रीलंका या वर्ल्डकपचे संयुक्त आयोजक आहेत. बांगलादेशच्या लढती कोलकाता आणि मुंबई होणार आहेत, मात्र आता त्यांच्या लढती श्रीलंकेला होण्याची शक्यता आहे. सरकारने दिलेल्या सल्ल्यानंतर आम्ही वर्ल्डकपसाठी भारतात न जाण्याचा निर्णय घेतल्याचे बांगलादेश क्रिकेट बोर्डाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# मोहम्मद शमीला पुन्हा डावलले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. या संघात अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला पुन्हा एकदा डावलण्यात आल्याने क्रीडा वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

दुखापतीतून नुकताच सावरलेल्या श्रेयस अय्यरने संघात पुनरागमन केले आहे. त्याने दुखापतीतून सावरल्यापासून एकही सामना खेळलेला नाही, पण शमी सातत्याने देशांतर्गत स्पर्धांमध्ये खेळताना दिसतोय. असे असूनही मोहम्मद शमीला संघात न घेतल्याने, त्याची नेमकी चूक काय? असा सवाल विचारला जात आहे.

मोहम्मद शमीने नुकत्याच झालेल्या देशांतर्गत स्पर्धा रणजी ट्रॉफी आणि विजय हजारे ट्रॉफीमध्ये प्रभावी कामगिरी केली होती. त्याने आपल्या तंदुरुस्तीचा आणि फॉर्मचा पुरावा दिला असतानाही निवड समितीने त्याला न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत संधी दिलेली नाही.

मार्च २०२५मध्ये झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर शमी एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. यावरून निवड समितीने असे संकेत दिले असल्याची चर्चा आहे की, २०२७च्या विश्वचषकाच्या दृष्टीने शमीऐवजी युवा वेगवान गोलंदाजांना अधिक प्राधान्य दिले जात आहे.

# नाशिकचा अष्टपैलू खेळाडू रामकृष्ण घोष गाजवतोय विजय हजारे चषक क्रिकेट स्पर्धा

**नाशिक : प्रतिनिधी**

चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून लागोपाठ दुसऱ्या वर्षी विश्वास टाकण्यात आलेला नाशिकचा अष्टपैलू खेळाडू रामकृष्ण घोष भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) एकदिवसीय विजय हजारे चषक क्रिकेट स्पर्धा गाजवित आहे. महाराष्ट्राकडून खेळताना प्रत्येक सामन्यात रामकृष्ण घोषने आपल्या चमकदार कामगिरीने सर्वांना चकित केले आहे.

नाशिकच्या रामकृष्ण घोष यास नाशिकचाच दुसरा अष्टपैलू खेळाडू सत्यजित बच्छाव याची चांगली साथ मिळत असल्याने हे दोन खेळाडू सध्या महाराष्ट्राच्या संघातील महत्वपूर्ण खेळाडू झाले असून या दोघांनी बलाढ्य मुंबई संघाविरुध्द धमाका केला.

अष्टपैलू रामकृष्ण घोषला आयपीएल २०२६च्या हंगामासाठी महेंद्रसिंह धोनी, ऋतुराज गायकवाडच्या बलाढ्य चेन्नई सुपर किंग्स (सीएसके) संघाने मागील हंगामाप्रमाणेच आपल्या ताफ्यात कायम ठेवले आहे. प्रथम श्रेणी क्रिकेटची अतिशय महत्त्वाची विजय हजारे ट्रॉफी ही एकदिवसीय मर्यादित



५० षटकांची स्पर्धा, नियमितपणे दरवर्षी बीसीसीआयतर्फे आयोजित करण्यात येते. सध्या जयपूर येथे महाराष्ट्राचे विजय हजारे चषक क्रिकेट स्पर्धेतील सामने होत आहेत. या स्पर्धेत नाशिकचा जलदगती गोलंदाज आणि अष्टपैलू रामकृष्ण घोष विलक्षण कामगिरी करीत आहे.

उत्तराखंडविरुध्द ३१ डिसेंबर रोजी झालेला सामना नाशिकच्या रामकृष्ण घोष आणि सत्यजित बच्छाव या अष्टपैलू खेळाडूंनी गाजवला. या दोघांच्या कामगिरीमुळे महाराष्ट्राने १२९ धावांनी विजय मिळविला. कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या १२४ धावांना सहाव्या क्रमांकावरील सत्यजित बच्छावने ४५ चेंडूतील ५६ (४ षटकार व २ चौकार) आणि सातव्या क्रमांकावरील रामकृष्ण घोषच्या ३१ चेंडूतील ४७ (२ षटकार व ४ चौकार) अशी जोरदार फटकेबाज साथ मिळाली. गोलंदाजीत सत्यजित (३) आणि रामकृष्ण (२) या जोडीने पाच गडी बाद करुन महाराष्ट्राच्या विजयात बहुमोल कामगिरी केली.

याआधी हिमाचल प्रदेशविरुध्द झालेल्या सामन्यात आपल्या भेदक गोलंदाजीने सात गडी बाद करून महाराष्ट्रातर्फे या स्पर्धेतील आतापर्यंतची विक्रमी कामगिरी रामकृष्ण घोषने नोंदवली. त्यानंतर तीन जानेवारी रोजी झालेल्या सामन्यात शार्दूल ठाकूरच्या नेतृत्वाखालील बलाढ्य मुंबई संघावर महाराष्ट्राने दणदणीत विजय मिळविला. यात फलंदाजीत रामकृष्णने पुन्हा चमक दाखवली. महाराष्ट्राच्या ३६६ धावांमध्ये रामकृष्ण घोषच्या नाबाद ६४ तडाखेबंद धावांचा समावेश होता. गोलंदाजीत रामकृष्णने यशस्वी जयस्वालचा महत्वाचा बळी घेतला. सत्यजितने दोन गडी बाद केले. नाशिकची रामकृष्ण-सत्यजित ही जोडगोळी महाराष्ट्रासाठी महत्वाचा आधार झाली आहे. फलंदाजी असो किंवा गोलंदाजी, दोन्ही क्षेत्रात त्यांच्याकडून कामगिरी होत आहे.

# मुस्तफिजुरची सूचक प्रतिक्रिया

**ढाका** : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूचनेनंतर आयपीएल संघ कोलकाता नाईट रायडर्सने (केकेआर) बांगलादेशचा स्टार वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमान याला संघातून मुक्त केले. भारत आणि बांगलादेश यांच्यातील बिघडलेले राजकीय संबंध आणि वाढता विरोध लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे.

डिसेंबर २०२५मध्ये झालेल्या मिनी लिलावात केकेआरने मुस्तफिजुरला ९.२० कोटी रुपयांची मोठी बोली लावून खरेदी केले होते, मात्र बांगलादेशातील अल्पसंख्याकांवरील अत्याचाराच्या घटनांमुळे भारतात बांगलादेशी खेळाडूंना आयपीएलमध्ये खेळवण्यावरून तीव्र संताप व्यक्त केला जात होता. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून बीसीसीआयने अखेर हस्तक्षेप केला आणि केकेआरला मुस्तफिजुरला संघातून बाहेर काढण्याचे निर्देश दिले.

संघातून काढून टाकल्यानंतर मुस्तफिजुर रहमानने सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली पहिली प्रतिक्रिया दिली. त्याने या वादावर थेट भाष्य करणे टाळले असले तरी त्याने आपल्या कामगिरीबाबत बोलून काही गोष्टी सूचित करायचे प्रयत्न केले. बांगलादेश प्रीमियर लीगमध्ये ४०० टी-२० विकेट्सचा टप्पा ओलांडल्यानंतर त्याने 'एक्स' वर लिहिले की, आणखी एका टप्प्यासाठी आभार. ४०० टी-२० बळी आणि सिलहट टायटन्सविरुद्ध मिळालेला विजय आनंददायी आहे. चांगली कामगिरी करण्यासाठी मी नेहमीच कृतज्ञ असतो. सर्वांच्या प्रेमासाठी आणि पाठिंब्यासाठी धन्यवाद!


## भावपूर्ण श्रद्धांजली



**कै. यमुनाबाई मुकुंद ठाकूर**

**यांचे सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!**

**दशक्रिया विधी**

**बुधवार, दि. ०७ जानेवारी २०२६ रोजी श्री श्रेत्र नाशिक येथे होणार आहे.**

**तेरावा विधी**

**शुक्रवारी, दि. ०९ जानेवारी २०२६ रोजी दिघाटी राहत्या घरी होणार आहे.**

**शोकाकूल**

**समस्त ठाकूर परिवार**

**(मु. दिघाटी, पो. केळवणे, ता. पनवेल)**

**टीप : कोणत्याही प्रकाराचे दुखवटे स्विकारले जाणार नाही.**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com